NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001
YEAR : 30 ) 1st May 2005 ( No : 03

# A G E N D A

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION to be held at 12.00 noon on *SUNDAY, the***

***22nd May, 2005 at***

**Auditorium of Amravati University, Amravati University Campus, AMRAVATI**

Agenda of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association to be held at 12.00 noon on Sunday, the 22 nd May, 2005 at Auditorium of Amravati University, Amravati University Campus, Amravati is as follows :-

## ITEM NO. 394 :
## *CONFIRMATION OF MINUTES :*

(A) TO CONFIRM the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 30 th January, 2005 at New Arts, Commerce & Science College, Batchelor Road, Murarka Layout, Wardha

*Notes :- 1) Copy of the minutes was Circulated on pages 2 to 18 of 2005 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 30 th January, 2005 at New Arts, Commerce & Science College, Batchelor Road, Murarka Layout, Wardha vide No.CIM/18 Dated 30th March, 2005 published on page 14 of 2005 NUTA Bulletin. No correction was received.*

## ITEM NO. 395 :
## *APPROVAL TO THE ANNUAL REPORT :*

TO CONSIDER AND APPROVE the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 2004.

***Notes :***

*(i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Association is prepared by the Executive Committee (vide item No.2 of 2005) and is to be placed for the approval of the General Body.*

*(ii) The Copy of the Annual Report is circulated* in this *NUTA Bulletin on page 28 to* ~~31~~

*(iii) Prof. E.H.Kathale, Secretary will present the Annual Report on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 396 :
## *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

TO APPROVE the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 2005.

***Notes :***

*(i) Prof. S.A.Tiwari, Treasurer, NUTA, will present the Budget on behalf of the Executive Committee.*

*(ii) The copy of the Budget is circulated on page No.29 of 2005 NUTA Bulletin.*

## ITEM NO.397 :
## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

TO CONSIDER AND APPROVE the following resolution for the appointment of Auditors for the Financial year ending on 31st March, 2005 namely :-

**"C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant "Prabha Niwas" Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 2005"**

***Notes :***

*(i) As per Article VII of the Constitution of NUTA the "General Body shall appoint auditors annually in the Annual Meeting of the Association."*

*(ii) The Executive Committee resolved to recommend the above resolution, (Vide item No. 45 of 2004) which is now*

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

**MEETING NOTICE : 2**

**Date : 01.05. 2005**

From
**Dr.E.H.Kathale,**
Secretary, **NUTA,**
N-162, Reshim Bagh, Nagpur-440 009.

To,
**All the members**
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that in exercise of the powers conferred on it by Article VIII of the Constitution of NUTA, the Executive Committee has decided to have the meeting of General Body at **12.00 Noon** on the date and at the place mentioned below.

2. Agenda of the General Body meeting is printed in this NUTA Bulletin. If you propose to suggest any amendments to any of the proposals/ Resolutions included in the Agenda, you may send it to me within a period of one week from the date of the posting of this Bulletin. It will not be possible for the amendments received after the due date to be included in the additional agenda. Please send one copy of your amendment to Prof. B.T.Deshmukh, President, NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.

3. Rules for proposing amendments to the proposals/resolutions are printed on page 97 of 1977 NUTA Bulletin. You are requested to kindly make it convenient to attend the meeting.

Yours faithfully,
Sd/- **Dr. E.H.Kathale**
Secretary, NUTA

***Date and Place of the meeting***

**at 12.00 Noon on, Sunday, the**

***22nd May, 2005 at***

**Auditorium of Amravati University, Amravati University Campus, AMRAVATI**

*placed before the General Body for its approval.*

*(iii) Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee, will move the resolution.*

**विषय क्रमांक ३९८ :**
***महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा आंदोलन विषयक ठराव***

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. डॉ. एकनाथ कठाळे हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

"महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक १३ मार्च २००५ रोजीच्या बैठकीत मंजूर केलेल्या आंदोलन ठरावाशी ही सभा सहमती व्यक्त करीत आहे."

**नोटस्** :- (१) उक्त ठराव २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १९ ते २४ वर प्रसृत करण्यात आलेला आहे.

(२) त्यानंतर १० एप्रिल २००५ च्या कार्यकारी मंडळाच्या पुणे बैठकीत झालेला ठराव २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३० वर प्रसृत करण्यात आलेला आहे.

**विषय क्रमांक ३९९ :**
***लक्षवेधी सूचनेवर विधानपरिषदेत झालेली चर्चा***

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या आंदोलन ठरावाच्या अनुषंगाने विधानपरिषद सभागृहात मंगळवार, दिनांक ५ एप्रिल २००५ रोजी लक्षवेधी सूचनेवर झालेल्या चर्चेची माहिती करुन घेणे.

**नोटस्** :- महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या आंदोलन ठरावाच्या अनुषंगाने विधानपरिषद सभागृहात मंगळवार, दिनांक ५ एप्रिल २००५ रोजी लक्षवेधी सूचनेवर झालेल्या चर्चेची माहिती २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३२ ते ३८ वर प्रसृत करण्यात आलेली आहे.

**विषय क्रमांक ४०० :**
***वरिष्ठ श्रेणीतुन निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देतांना शासन निर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण संचालकांनी काढलेले परिपत्रक***

"वरिष्ठ श्रेणीतुन निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देतांना शासन निर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण संचालकांनी काढलेले परिपत्रक" या विषयावर मंगळवार, दिनांक ५ एप्रिल २००५ रोजी व त्यानंतर तारांकित प्रश्न क्रमांक १९२२ वर गुरुवार, दिनांक ७ एप्रिल २००५ रोजी झालेल्या चर्चेची माहिती करुन घेणे.

**नोटस्** :- "वरिष्ठ श्रेणीतुन निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देतांना शासन निर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण संचालकांनी काढलेले परिपत्रक" या विषयावर मंगळवार, दिनांक ५ एप्रिल २००५ रोजी व त्यानंतर तारांकित प्रश्न क्रमांक १९२२ वर गुरुवार, दिनांक ७ एप्रिल २००५ रोजी झालेल्या चर्चेची माहिती २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३२ ते ३८ वर प्रसृत करण्यात आलेली आहे.

**विषय क्रमांक ४०१ :**
***उच्च शिक्षण संचालकांनी काढलेली परिपत्रके***

उच्च शिक्षण संचालकांनी काढलेल्या पुढील आदेशांची / परिपत्रकांची नोंद घेणे.

**नोटस्** :- (१) दिनांक २७.१०.२००४ रोजीचे शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे "शिक्षण शुल्कातून वेतनेत्तर अनुदान अदा करणे" या विषयावरील पत्र क्रमांक अ.शा. पत्र क्रं. बीयूडी-२००४/वेतनेतर अनुदान/लेखा-२ (सन २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३२ वर प्रसृत)

(२) दिनांक २८.३.२००५ रोजीचे शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे "महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या निवड समिती व स्थाननिश्चिती समितीवर प्रतिनिधी म्हणून करावयाच्या नेमणुकाबाबत." या विषयावरील परिपत्रक क्रमांक उशिसं/२००५/परीप/स्थाननिश्चिती/मवि-१ (सन २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३३ वर प्रसृत)

(३) दिनांक २८.३.२००५ रोजीचे शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे "अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व विधी आणि अध्यापक महाविद्यालयाचे वेतन अनुदानाबाबत" या विषयावरील परिपत्रक क्रमांक उशिसं/२००५/परीप/वे.अ./मवि-१ (सन २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३४ वर प्रसृत)

(४) दिनांक २८.३.२००५ रोजीचे शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे "खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाढीव पूर्ण वेतन देण्याबाबत" या विषयावरील परिपत्रक क्रमांक उशिसं/परीप/२००५/अनु/विशि-१ (सन २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३५ वर प्रसृत)

(५) दिनांक ३०.३.२००५ रोजीचे शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे "खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाढीव पुर्ण वेतन देण्याबाबत" या विषयावरील सुधारित परिपत्रक क्रमांक उशिसं/२००५/परीप/अनु/मवि-१ (सन २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३७ वर प्रसृत)

(६) दिनांक ४ एप्रिल २००५ रोजीचे शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे वेतन "वितरण कक्षाची स्थापना" या विषयावरील कार्यालयीन आदेश क्रमांक उशिसं/२००५-२००६/ (सन २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३१ वर प्रसृत)

(७) दिनांक ११.४.२००५ रोजीचे डॉ. एस.एन.पठाण, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे "खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे एक तारखेस वेतन देणे बाबत." या विषयावरील परिपत्रक क्रमांक उशिसं/२००५/लेखा -२ (सन २००५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३६ वर प्रसृत)

**विषय क्रमांक ४०२ :**
***नुटा बुलेटीनच्या रौप्य महोत्सवी विशेषांक मालिकेच्या प्रकाशनाबाबतचा अहवाल***

**(अ)** डॉ. अनिल सोमवंशी यांनी कार्यकारी मंडळाच्या वतीने मांडलेला नुटा बुलेटीन रौप्य महोत्सवी विशेषांक मालिका प्रकाशनाच्या कार्यपूर्तीबाबतचा पुढील **'अहवाल भाग : दोन' विचारात घेणे व सम्मत करणे :-**

"नुटा बुलेटीनच्या रौप्य महोत्सवी विशेषांक मालिकेच्या प्रकाशनाबाबतचा अहवाल" विषय क्रमांक ३५१ नुसार दिनांक ३० नोव्हेंबर २००३ रोजी झालेल्या आमसभेच्या बैठकीसमोर सादर करण्यात आला होता. (कार्यवृत्त २००३ च्या नुटा बुलेटीनचे पृष्ठ क्रमांक ११६ वर) हा अहवाल लहान लहान १ ते ६ परिच्छेदाचा होता. त्यास "अहवाल भाग एक" असे संबोधण्यात यावे. अहवाल भाग-२ आता सादर करण्यात येत आहे. हा अंतिम अहवाल असून परिच्छेद क्रमांक पुढचे देण्यात आलेले आहेत.

**नुटा बुलेटीनच्या रौप्य महोत्सवी विशेषांक मालिकेच्या**

**प्रकाशनाबाबतचा अहवाल : भाग दोन**

(७) **विशेषांक मालिकेच्या संदर्भात** :- नुटा बुलेटीनच्या रौप्य महोत्सवी विशेषांक मालिकेत जे एक ते अकरा विशेषांक प्रकाशित करण्यात आले, त्यातील काही विशेषांकामध्ये विशिष्ट विषयावरील शासननिर्णयांचे संकलन समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्याबाबत असे नमूद करण्यात येत आहे की, या संकलनामध्ये काही शासन निर्णय सुटून गेले असण्याची शक्यता आहे. हे शासन निर्णय अस्तित्वात असावेत, विशेषांक विषयाशी संबंधित असावेत, असे काही संदर्भावरून वाटल्याने त्यांची एक यादी तयार केलेली आहे. ते तसे असतीलच असे नाही. नुटा बुलेटीनच्या प्रकाशकांनी मेहनतीने ही यादी तयार केली असून ती यादी नोंदबद्ध झाल्यास ती मेहनत वाया जाणार नाही व पुढील काळात संदर्भ अद्यावत करण्याच्या उपक्रमाला या नोंदीची मदत होईल असे वाटल्यावरुन ही यादी नोंदबद्ध करण्यात आली आहे. ही यादी २००३ च्या इक्स फाईलच्या पृष्ठ १०२, १०३ व १०४ वर प्रसृत करण्यात आलेली आहे.

(८) **शब्द युद्ध विशेषांकाच्या संदर्भात** :- शब्दयुद्ध विशेषांक भाग १० पर्यंतच्या प्रकाशनापर्यंतची माहिती अहवाल भाग १ च्या परिच्छेद ४ मध्ये देण्यात आलेली आहे. त्यानंतर शब्दयुद्ध विशेषांक भाग ११ : दिनांक १ मार्च २००४ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्दयुद्ध विशेषांक भाग १२ : दिनांक १ एप्रिल २००४ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्दयुद्ध विशेषांक भाग १३ दिनांक १ मे, २००४ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्दयुद्ध विशेषांक भाग १४ : १ सप्टेंबर २००४ रोजी प्रकाशित करण्यात आला. शब्दयुद्ध विशेषांक भाग १५ हा १५ सप्टेंबर २००४ रोजी प्रकाशित करण्यात आला. त्यानंतर अनुक्रमणिका देऊन शब्दयुद्ध विशेषांक मालिकेचे काम संपुष्टात आले आहे.

(९) वरील सर्वच रौप्य महोत्सवी विशेषांकामध्ये संकलन व छपाई खुप

काळजीपूर्वक करण्यात आलेली आहे. तथापि काही किरकोळ स्वरुपाच्या चुका व मुद्रण दोष नजरचूकीने राहण्याची शक्यता नाकारता येवू शकत नाही. हा सर्व मजकूर संगणकावर साठविलेला असल्याने त्या मजकूराला शंभर टक्के मुद्रणदोष मुक्त करण्याचे काम यथावकाश पुढे केंव्हा तरी आवश्यकतेनुसार हाती घेता येईल.

(१०) काही विषयावर, किंवा काही विषयासंबंधी शासननिर्णयाचे संकलन एखाद्या दुसऱ्या विषयाच्या बाबतीत विशेषांक म्हणून प्रकाशित करण्याचे राहून गेले असल्यास तयारी पूर्वक यापूढे नियमित बुलेटीनचा भाग म्हणून त्याचे प्रकाशन करता येईल. सन २००२ च्या पहिल्या अधिवेशनानंतरच्या विधानपरिषदेतील अधिवेशनाच्या अधिकृत प्रतिवेदनाच्या प्रती उपलब्ध झाल्यानंतर यथावकाश नियमित बुलेटीनचा भाग म्हणून आवश्यक तो मजकूर वेळोवेळी प्रकाशित करण्याचे संकल्पीत आहे.

(११) अहवाल भाग १ च्या परिच्छेद ६ मध्ये नमुद केलेल्या संगणकीय 'सीडी'बाबत असे नमुद करण्यात येत आहे की, ही सीडी मुख्यत्वे ३ विभागात विभाजित करण्यात येईल. पहिल्या भागात "विशेषांक मालिका" दुसऱ्या भागात "शब्दयुद्ध विशेषांक" व तिसऱ्या भागात "सन १९९५ ते सन २००४ पर्यंतचे नियमित नुटा बुलेटीन" यांचा समावेश करावा असा संकल्प आहे.

### विषय क्रमांक ४०३ :
### *स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठाबाबत संघटनेची भूमिका*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. डॉ. एकनाथ कठाळे हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

"महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या आमसभेने दिनांक २ ऑक्टोबर २००४ रोजीच्या बैठकीत सम्मत केलेल्या ठरावाशी ही सभा सहमती व्यक्त करीत आहे"

नोट : उक्त ठराव सन २००४ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १५१ वर यापूर्वीच प्रसृत करण्यात आलेला असून तो पुढील प्रमाणे आहे. :-

"The **Annual** General Council Meeting of the Maharashtra Federation of University and College Teachers Organisations (MFUCTO) is shocked to see the advertisement dated 1st October 2004 in Times of India and other News papers by the Higher and Technical Education Department, Government of Maharashtra inviting applications for the establishment of Self-Financed Universities in the State of Maharashtra. Provisions in clause 5(1) of Maharashtra Ordinance No. XXII of 2004, dated 16th August 2004 is permitting all the Trust/Society which are registered on or before 30.9.2004 and can enclose a Demand Draft of Rs. 15 lakhs towards the processing fee to send applications and project report in the prescribed form for establishing new Self-Financed University for undergraduate degree level and post graduate level courses in Engineering/Technology/ Pharmacy/Architecture Town Planning/Hotel Management and Catering Technology/ Applied Arts and Crafts and M.B.A and M.C.A./Health Sciences/ Biotechnology/Humanities like Arts, Science and Commerce/Law/Education /Physical Education/Music/ Performing Arts/Finance/Sports etc.

This is in continuation of the privatisation and liberalisation policy pursued by the Governments at the national and state level. This is an attempt to kill the public funded education which is already in deep crisis. The issue of this advertisement despite the prevalence of the election code of conduct is a clear case to appease the education barons and prompt them to give funds liberally to the ensuing Maharashtra Assembly election scheduled for 13th October 2004.

The Annual General Council Meeting of the MFUCTO hereby urge the Hon. Chancellor and Governor of Maharashtra to intervene in this matter direct the government to withdraw the above advertisement inviting applications for the establishment of Self-Financed Universities in the State of Maharashtra with immediate effect."

### विषय क्रमांक ४०४ :
### *रु. १४९४० वर वेतन निश्चिती बाबत अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाची भूमिका*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. डॉ. अनिल ढगे हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

निवडश्रेणीतील शिक्षकाला रुपये १४९४० वेतननिश्चिती देण्याबाबत अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाने केलेल्या पुढील मागणीशी हे सभागृह सहमती व्यक्त करीत आहे. :-

"As new CAS is applicable only from 27th July 1998 the fixation benefit of Rs. 14,940/- should also be given to the persons entering in to selection Grade /Reader Scale up to 27th July 1998"

**Notes :-** Position of the organisation at AIFUCTO level (circulated on page 92 of 2004 NUTA Bulletin) is as follows:-

The fixation benefits of Rs. 14,940/- is given to persons who are in the scale of Rs. 3700-5700 as on 1-1-1996 and on completion of five years in the selection grade i.e. after completion of 21 years (18 years with Ph.D. or 20 years with M.Phil.) But as new CAS is applicable only from 27th July 1998 the fixation benefit of Rs. 14,940/- should also be given to the persons entering in to selection Grade /Reader Scale up to 27th July 1998. If this benefit is not given, then these persons can get Rs. 14,940/- only after completion of 23 years, where as juniors get after 18 years, as per new norms. This is unjust. Therefore, we request you to give the fixation benefit of Rs. 14,940/-, for those persons who enter in to selection grade upto 27-7-1998 and not to restrict only up to 1-1-1996. On 9-1-2004, in our meeting with JS(HE) we were informed the matter shall be settled after discussion with UGC.

### विषय क्रमांक ४०५ :

प्रा. डॉ. शशिकांत वि. चौधरी पुढील प्रस्ताव मांडतील. :-

"स्वयंअर्थसहाय्यीत खाजगी विद्यापीठांच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र शासनाद्वारे केल्या जात असलेल्या प्रयत्नांचा, धोरणांचा व महामहिम मा. राज्यपाल ह्यांनी काढलेल्या "Maharashtra Ordinance No XXII of 2004" चा ही सभा निषेध व्यक्त करते व तिव्र विरोध दर्शविते."

## ITEM NO. 406 :
## *PLACEMENT IN SELECTION GRADE AFTER 1.1.96 AND FIXATION AT 14940*

Prof. R.Y.Kale will move the following resolution :-

"Lecturers (Selection grade) / Readers / Assistant Professors promoted on / after 02.01.1996 are deprived of the stepping up of basic pay to Rs. 14940/- as and when they complete 5 years of service in the grade. It creates a clearcut difference of two increments between a teacher promoted on 01.01.1996 and other on 02.01.1996."

# SECRETARY'S REPORT ON THE WORKING OF THE ASSOCIATION FOR THE YEAR ENDING ON 31st DECEMBER, 2004.

*Prepared by the Executive Committee of NUTA under article (VI)(b)(ii) of the Constitution of NUTA and presented by Secretary on behalf of the NUTA Executive.*

Dear Friends,

(1) It gives me great pleasure to accord you all a cordial welcome on behalf of the Executive Committee of NUTA and on my own behalf. It is indeed a proud privilege for me to place before this august body a brief account of our activities and achievements during the year 2004.

(2) Right from its inception, NUTA has been committed to the cause of the welfare of the teaching community. In keeping with this commitment, the organization took up several issues concerning teachers during the period of this report.

(3) During the current year, the organization achieved success in getting a few of our demands fulfilled by the Government. The President of the organization, Prof. B.T.Deshmukh followed up the issues in the legislative council with his usual perseverance and got the relevant orders issued by the Government. They include G.R. dated 16 th February, 2004 regarding release of non-salary grants to the aided non-government arts, commerce, science, law and education colleges affiliated to the non-agricultural universities, G.R. dated 10 th June, 2004 on release of increased D.A. to the Govt. and other full-time employees with effect from 1st June, 2004, G.R. dated 19 th July, 2004 on merger of 50% D.A. in Basic pay to the Govt. and other eligible employees and G.R. dated 20 th July, 2004 on merger of 50% D.A. for pensionary benefits with effect from 1st August, 2004. It must be mentioned here that the pressure built up by the organisations of Govt. and semi Govt. employees outside the house was mainly instrumental in moving the Govt. in this behalf.

(4) Prof. B.T. Deshmukh, President, NUTA and his colleagues in the Legislative Council with their parliamentary skills and perseverance succeeded in getting the positive assurances from the minister of the concerned departments on important issues like non-salary grants to the Govt. aided Primary, Secondary, Higher Secondary schools and Junior colleges in Maharashtra as well as filling of vacant posts in senior colleges.

(5) **Election to the Legislative Council from the Amravati Division Graduates Constituency** :

(a) Dear friends, 24 years back NUTA had taken a decision to nominate Prof. B.T. Deshmukh as its official candidate from Vidharbha Graduates Constituency for Legislative Council. NUTA believed that the direct participation of a teacher representative responsible to the Organization would go a long way in safeguarding the interests of teachers. This view of the Organization was fully vindicated with the success achieved by Prof. B.T. Deshmukh in solving the problems of the teachers and other sections of the Society through his outstanding performance in the Council. Prof. B.T. Deshmukh has made a mark as the most noteworthy member of the Legislative Council ever since he entered the House in 1980.

(b) NUTA Executive, therefore, once again decided to put up the official candidature of Prof. B.T. Deshmukh from Amravati Division Graduates Constituency for election to the Legislative Council held on the 30 th November, 2004. The Vidharbha Madhyamik Shikshak Sangh had also declared the candidature of Shri V.U. Daigavane from Nagpur Division Teachers' Constituency. A joint meeting of the Executive Committees of both the organizations was held at Wardha on 11.7.2004 in which it was decided to offer mutual support to both the candidates. District-wise meetings of teachers and Registered Graduates were organized in Nagpur and Amravati regions respectively to appeal to the voters to vote in favour of these candidates. The meetings were jointly addressed by the leaders of both the organizations.

(c) In response to NUTA's request almost all the secular political parties and various professional organizations supported the candidature of Prof. B.T. Deshmukh. I am glad to inform the House that Prof. B.T. Deshmukh was elected for the fifth consecutive term with a thumping majority mainly due to the support from all the sections of the society and thus also established a new record of getting elected for the fifth consecutive term from Graduates constituency in the Legislative Council of Maharashtra. While congratulating Prof. B.T. Deshmukh, I take this opportunity to place on record our sincere thanks to all those who made this victory possible and so outstanding. I also thank all members and non-members of NUTA who have contributed generously to the 'Prof. B.T. Deshmukh Election Fund.' I also congratulate Shri V.U. Diagavane who was elected from Nagpur Division Teachers' Constituency for the third consecutive term with a convincing margin as an official candidate of VMSS, with the support from NUTA. NUTA places on record its appreciation for the cooperation given by the Madhyamik Shikshak Sangh.

(6) **Election to the Executive Committee of MFUCTO** :

The General Council of MFUCTO, which met at Mumbai on the 2nd October, 2004 elected the new Executive Committee for the period 2004-2006. I am glad to inform you that the following members of the NUTA Executive Committee were elected to the MFUCTO Executive Committee.

Dr. E.H. Kathale, General Secretary

Prof. V.B. Dhone, Vice-President

Dr. D.U. Pochhi, Vice-President

Prof. B.T. Deshmukh, Executive Committee Member

Dr. S.A. Tiwari, Executive Committee Member

Prof. A.W. Dhage, Executive Committee Member

Dr. R.B. Golait, Executive Committee Member

Prof. S.R. Kalmegh, Executive Committee Member

Prof. M.D. Misal, Executive Committee Member

On behalf of all of you, I congratulate all these elected representatives.

(7) **Placement Issue of Lecturers of P.W.S. College, Nagpur**.

Friends, you are aware that the Joint Director (H.E.) of Nagpur Division had intentionally kept the proposals of placement of 9 lecturers of P.W.S. College Nagpur pending on flimsy and illogical grounds. In fact the prescribed procedure and formalities as laid down in Direction No. 45 of Nagpur University were completely followed by the College. The Joint Director returned these proposals raising an objection that the minutes of the Selection Committee did not have the signature of Govt. nominee in spite of the fact

**RULES FOR PROPOSING AMENDMENTS**
**(Reproduced from page 97 of 1977 NUTA Bulletin )**

1. Any proposal before the meeting may be amended

(a) by leaving out a word or words or

(b) by leaving out a word or words in order to add or insert a word or words or

(c) by adding or inserting a word or words.

2. An amendment to be in order shall : (a) not constitute a direct negative to the original resolution : (b) be relevent to and within the scope of the resolution to which it is moved.

that the nominee of Joint Director was absent at the scheduled meetings of selection committee.

The issue was handed over to the organization. NUTA acted immediately and wrote two letters to the Direcor (H.E.) Pune on 1st April, 2004 and 26 th April, 2004 requesting him to direct the Joint Director of Nagpur Division to clear these proposals of placement. Since no positive response was given either by Joint Director or Director, NUTA organised demonstrations on 5.5.2004 in front of Joint Director's office at Nagpur. However, since the issue was not resolved Prof. B.T. Deshmukh, President, NUTA moved calling attention motion in the Council. Friends, I am pleased to inform this house that because of the calling attention motion, the concerned minister had to state in his statement that these 9 cases of P.W.S. college teachers have been cleared alongwith all pending cases in Nagpur Division. Further, the Minister had stated in his statement that explanation had been sought from Joint Director, through Director (H.E.) as to why these proposals were kept pending for such a long time. I take this opportunity to congratulate these 9 teachers of P.W.S. college for adopting correct stand and not conceding to the irrational expectations of the Joint Director. I also thank all my fellow teachers who participated in the demonstrations held at Nagpur.

**(8) Release of Stagnation Increment** :You are aware that as per G.R. dated 25 th January, 1999 and also G.R. dated 14 th September, 1999, the teachers working in unaided affiliated colleges are entitled for stagnation increment. However, the teachers in Nagpur University area were deprived of this benefit by the Joint Director of Nagpur Region on the ground that the provision of stagnation increment was applicable only to the teachers working in Govt. Colleges. The issue was brought to the notice of NUTA leaders by the affected teachers. The delegation of NUTA met the Joint Director on 28.11.2003 to discuss the issue along with other pending problems of teachers of Nagpur region. I am glad to inform this august body that because of the pressure of the organisation the Joint Director was compelled to issue necessary instructions immediately to the colleges informing them that they can submit the proposals for stagnation increment.

(9) **Contradictory stand of Director of Higher Education on appointment of lecturers in colleges on contract basis**.

Friends, you are aware that G.R. dated 25.7.2002 provides for appointment of teachers in colleges on contract basis for two years or till the regular appointment whichever is earlier. However, the circular issued by the Director, Higher Education for giving NOC stated that the appointment of teachers on contract basis would be for one academic session only. The 25 teachers from Amravati University area who were appointed on contract basis submitted a memorandum to the Director (H.E.) opposing the contradictory order issued by the Director of Education.

This issue was also brought to the notice of the organisation by the concerned teachers. Prof. B.T. Deshmukh, President of NUTA immediately wrote to the Director of Education and requested him to withdraw immediately his order which was against the G.R.. I am pleased to inform you that because of timely intervention by our President the D.E. was forced to withdraw his orders vide his letter dated 8.4.2004.

(10) **Participation in Action Programme** :

The members of NUTA participated in various action programmes in response to the call given by AIFUCTO and MFUCTO from time to time to press for the solution of pending problems of the teaching community.

(11) **Problem of NET/SET affected Teachers** :

Friends, you are aware that Government of Maharashtra, has issued a G.R. on 18 th October, 2001, whereby teachers appointed on or after 11.12.1999 were to be terminated before completion of their probation period. Some of the teachers from different Universities of Maharashtra were issued termination orders and other teachers falling in this category were in the process of issuance of termination orders as a consequence of resolution dated 18.10.2001. These teachers

## BUDGET FOR THE FINANCIAL YEAR - 2005-2006

OFFICIAL ACCOUNTING YEAR OF THE TRUST : 2004-2005 (AS PER SCHEDULE VII-A OF THE B.P.T.A. 1950)

***Name of the Trust*** **: NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION.**

Regn. of the Trust : B.P.T.A. Regn. No. F-1594 & Soc. Regn. Act. Regn. No. MAH-15-73(NGP)

| ESTIMATED RECEIPTS | RS. P. | ESTIMATED DISBURSEMENTS | Rs. P |
|---|---|---|---|
| **I. OPENING BALANCE :** | | **A) NON-RECURRING :** | |
| i) Cash in hand … … | … .. | i) Major Repairs or rebuilding of the assets etc. ... | .. . . .. |
| ii) Cash in Bank … … | 15,000 00 | ii) Net purchase of immovable property ... | … .. |
| **II. ESTIMATED RECEIPTS :** | | **B) RECURRING** : | |
| **(A) NON RECURRING** | | i) Rents, rates taxes etc. ... | 4,000.00 |
| i) Ordinary Donations to be received for specific earmarked objects (permanent subscription to NUTA Bulletin) … … | … .. | ii) Administrative Expenses ... | … .. |
| ii) Ordinary Donations … | … .. | a) Stationery, Typing , Cyclostyling & Printing . ... | 2,25,000.00 |
| **(B) RECURRING** : | | b) Travelling Expenses . ... | 40,000.00 |
| i ) Rent etc. on immovable property | … .. | c) Postage and Telephone. ... | 10,000.00 |
| ii) Interest on Fixed Deposits | 3,00,000 00 | d) Misc. expenses ... | 4,000.00 |
| iii) Dividend shares etc … | … .. | e) Bank commission ... | 400.00 |
| iv) Income from Agri. land … | … .. | f) Legal Expenses ... | 1,000.00 |
| v) Other revenue Receipt … | … .. | g) Audit fees ... | 1,500.00 |
| vi) Legal Aid Fund … | … .. | h) Affiliation fees ... | |
| | | i) MFUCTO ... | 4,000.00 |
| | | ii) AIFUCTO ... | 7,000.00 |
| | | iii) Contribution to public trust\ admn. Fund ... | |
| **III.REALISATION FROM DISPOSAL OF ASSETS** : | … .. | vi) Books Library | 12,000.00 |
| | | iii) Payment of Salaries ... | 9,600.00 |
| | | iv) Transfer of Depreciation Fund | |
| **IV EXCESS OF EXPENDITURE OVER INCOME :** … | 13,500 .00<br>… .. | v) Special & Current repairs of building Furniture etc ... | 10,000.00 |
| | | vi) Excess of income over expenditure ... | |
| **TOTAL Rs.** | **3,28,500.00** | **TOTAL Rs.** | **3,28,500.00** |

**NOTE** : Estimated enrolment of members during the year is expected to be 10. On this account the Association will receive an estimated amount of Rs. 40,010/- However this amount cannot be included in the estimated receipts because this amount is to be invested in fixed deposit receipts or any other Govt. Securities as per Artcle III of the Constitution . - Sd. **S. A. Tiwari**, Treasurer.NUTA

had filed petitions before the Mumbai High Court and the Benches of Mumbai High Court at Nagpur and Aurangabad and they were granted status-quo-/stay. Ultimately their petitions were clubbed for final hearing by Hon'ble Mumbai High Court. You are also aware that Mumbai High Court has delivered an important judgement in respect of this bunch of petitions on 18.4.2002. According to this decision of the Mumbai High Court a time bound programme was given to submit the proposals to the UGC for the grant of relaxation by the respective universities before 18 th December, 2002. I am glad to inform you that in both the Universities proposals of these teachers were submitted within prescribed time limit. I am also pleased to inform you that the NUTA representatives elected on different bodies of Amravati and Nagpur University were instrumental in contributing to the framing and finalizing these proposals based on sound and lawful arguments. You are also aware that MFUCTO too has submitted a memorandum dated 30 th March, 2003 to the UGC on appointment of teachers in the universities and colleges in Maharashtra and the NET/SET qualification condition and requested the UGC to provide an opportunity to the MFUCTO to explain in person the various aspects of this problem in the form of improper treatment to NET/SET qualification condition. The UGC has informed that the matter was under consideration of the Commission in consultation with the universities in the State of Maharashtra. I regret to bring to your notice that U.G.C. did not respond positively and an opportunity to MFUCTO has not been given so far to explain its stand on the issue. On the contrary U.G.C. has pressurized the Universities in Maharashtra through the State Government for submitting the proposals of non NET/SET teachers who were appointed from 1991 to 31st December, 1999 and seek relaxation from NET/SET. In fact while submitting the proposals of the Lecturers who were appointed after 31st December, 1999, the Vice-Chancellor of Amravati University and the Registrar of Nagpur University had made it very clear that the teachers appointed between 1991 and 1999 require no relaxation / examption as they were lawfully appointed. Unfortunately some of the universities have submitted the proposals conceding to the pressure of U.G.C. This act on the part of U.G.C. has been condemned by MFUCTO in its meeting held on 9 th January 2005 and the Federation has also decided to file petition in the High Court challenging the act of U.G.C. I assure all of you that the NUTA and MUFCTO have been carefully watching the situation and will see that the interests of the non NET/SET teachers are fully protected.

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION

## ( M F U C T O )

*(Registered under the Trade Union A 1926, Reg. No. By - II-8162 of 1985)*

Affiliated to the All Indian Federation of University and College Teachers' Organizations (AIFUCTO)

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.**

**President**
Prof. C.R. Sadasivan
R.K. Gokuldham, A205
S.V.Road, Borivli (W)
Mumbai - 400 092
Mob: 9820781441

**General Secretary**
Prof. E.H. Kathale
N/162 Reshimbagh,
Nagpur - 440 009
Tel.-0712-2741098

**DATE : 10TH APRIL 2005**

### Resolution adopted at the meeting of the executive committee of the MFUCTO on Sunday, 10th April 2005 at Pune.

1. WHEREAS the MFUCTO at its Meeting of the executive committee held in Mumbai on Sunday, 13th March 2005 adopted its Movement Resolution calling upon the State Govt. to remove Dr. S.N. Pathan, Director of Higher Education in the state for his various commissions and omissions as set out in the resolution;

2. WHEREAS the MFUCTO there after submitted a copy of the Resolution to the Hon'ble Minister for Higher & Technical Education Shri. Dilip Valsepatil, to initiate immediate action on the resolution including conveying a meeting to discuss the issues with the Executive Committee of the MFUCTO at an early date;

3. WHEREAS in response to the Calling Attention motion moved by Prof. B.T. Deshmukh and other members, the Hon'ble Minister for Higher Education has made a statement on floor of the Maharashtra Legislative Council on 5th April 2005 giving assurance that he would convene a meeting to discuss the various issues with the MFUCTO;

4. WHEREAS the Director of Education Dr. S.N. Pathan has initiated some steps as intimated by him through Fax messages to the MFUCTO.

5. WHEREAS the issues raised in the Movement Resolution are very serious and need proper negotiation and settlement.

THEREFORE this meeting of the executive committee of the MFUCTO held at Pune on Sunday 10th April 2005 resolves :-

i) To go ahead with the MASSIVE DHARNA on 11th April 2005 from 12 noon to 5 pm. at the office of Director of Higher Education, to press for its demands.

ii) To meet the Director Higher Education at 1 pm. on 11th April 2005 as suggested by him and hand over to him a copy of the letter dated 17th March 2005 sent by the MFUCTO to the minister along with the copy of movement resolution.

iii) To continue MFUCTO'S demonstration in full strength and vigour as per the schedule already announced and contained in the movement resolution.

iv) To consider the question of suspension or withdrawal of the agitation only after a negotiated settlement is reached with the Govt.of Maharashtra.

**Prof. E.H. Kathale**
General Secretary

**Prof. C.R. Sadasivan**
President

(12) **Tasks Ahead** :

**(a) Self-financing universities in the state of Mahrashtra**:

The Govt. of Maharashatra has issued the advertisement dated 1st October, 2004 in Times of India and other news papers, inviting applications for the establishment of Self Financed Universities in the State of Maharashtra. This is in continuation of the privatisation and liberalisation policy pursued by the Government at the National and State level. We have to fight against this move under the able leadership of MFUCTO.

**(b) Issue of Feeder Cadre** :

(i) The G.R. dated 11th December, 1999 in para 16 provides the scheme of feeder cadre. The para 16 of the said G.R. reads as follows :

"If number of years required in a feeder cadre are less than those stipulated in this notification, thus entailing hardship to those who have completed more than the total number of years in their entire service for eligibility in the cadre, may be placed in the next higher cadre after adjusting the total number of years".

(ii) The U.G.C. Notification dated 24 th December, 1998 also had made similar provision. This was also endorsed by U.G.C. Notification dated 4 th April, 2000. The letter addressed to the Chief Secretary, Govt. of Kerla dated 9 th October, 2003 by the U.G.C. also made clear in explicit term with respect to the scheme of feeder cadre. The relevant para of the said letter reads as follows :

"I am directed to inform you that as per clause 7.8.0 of UGC notification No. F.3/1/94(PS) dated 24.12.1998, the lecturers who got promotion/ placement as lecturer (Senior scale) after completion of 8 years service, are eligible for promotion as Lecturer (Selection grade) on completing of total 11 years service i.e. without completing 5 years service as lecturer (senior scale)".

(iii) The Director, (H.E.) has taken a contradictory stand ignoring these provisions. In his letter dated 14 th February, 2002 he has insisted on 5 years of service in senior scale to move into selection grade.

(iv) Organisation took up this issue seriously. Prof. B.T Deshmukh, President, NUTA has written letter on 6.3.2004 to the Director, Higher Education and requested him to withdraw his contradictory letter. The Director of Higher Education again sought clarification from U.G.C. to delay the matter. We have to be ready to fight against this move in a organised manner in near future.

**(c)** The discrimination caused by the government regarding the date of implementation of fifth pay commission pay scales to the teachers of unaided engineering colleges has also not been done away with. It would be an important task for us to see that justice is done to them.

**(d)** The government of Maharashtra had issued the G.R. dated 25 th July, 2002 on contractual appointments of teachers in the colleges which was in total violation of the provisions of M.U. Act, 1994 and the existing statutes of the universities. Because of our struggle at state level under the leadership of MFUCTO, Government of Maharashtra was compelled to stay the operation of the same. However, the government of Maharashtra has again issued a new G.R. dated 19 th July, 2003 with a few cosmetic changes by which the government has directed appointments of lecturers on contractual basis.

The MFUCTO therefore, called upon the Government not to proceed with the implementation of new G.R. dated 19th July, 2003 and earlier G.R. dated 25 th July, 2002 and withdraw the same forthwith and replace it by a G.R. allowing recruitment of lecturers in the universities and colleges on the basis of the provisions of M.U. Act, 1994. We will have to keep ourselves ready to participate in the action programme to be decided by the MFUCTO to get the way paved for regular appointments.

**(e)** Ambani- Birla report alongwith Waghmare Committee has posed a serious challenge before the field of education in general and higher education in particular. It will have to be fought tooth and nail in the years to come. The issues pertaining to the Librarians and the Directors of Physical education will have also to be addressed.

(13) **MEMBERSHIP OF NUTA** :

The NUTA membership has reached upto 4824 at the end of year. This year the increase in membership is 36.

(a) I am glad to inform you that NUTA Bulletin has completed 29 th year of its purposeful existence. This year we have circulated 152 pages of NUTA bulletin. If you go through the NUTA bulletin from first to the last page, you will find that NUTA Executive has tried to give up-to-date information to all its members about their problems and how the NUTA Executive particularly its President Prof. B.T. Deshmukh has focussed them at Maharashtra Govt. level through the Legislative Council.

(b) I am thankful to the press and their representatives both from Nagpur and Amravati areas, for wide coverage of the activities of the Association. This report shall not be complete unless I acknowledge the active cooperation and support of all the members of NUTA and also from non-members i.e. University, College and Junior College Teachers in the activities of the Association and response given by them to the various calls given by NUTA from time to time.

Yours

(Dr. E.H. Kathale)

Secretary, NUTA

**क्रं. उशिसं/२००७-२००६/**

## *शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)*
## *महाराष्ट्र राज्य, पुणे-१*

***दिनांक ४ एप्रिल, २००५.***

***कार्यालयीन आदेश***

संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक उशिसं/२००५/परीप/अनु/मवि-१ दिनांक ३०/३/२००५ नुसार राज्यातील खाजगी अनुदानित महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना व सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पूर्ण वेतन सर्व लाभांशासह काढण्यासंबंधी आपणास मिळालेच असेल. त्याप्रमाणे आपण आपल्या स्तरावर वेतन वितरण कक्ष (Salary Distribution Cell) स्थापनही केला असेल. या कक्षामध्ये आपल्या कार्यालयातील जे अधिकारी/कर्मचारी आहेत त्यांची नांवे संचालनालयास त्वरित कळवावीत कारण त्याप्रमाणे त्यांच्या कामाची नोंद संचालनालयाच्या स्तरावर घेण्यात येईल. आपण प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून सुधारित वेतन प्रत्येक शिक्षकनिहाय काढून आपल्या विभागाची एकूण मागणी मे, २००५ महिन्यासाठी नोंदवावयाची आहे. यामध्ये जी प्रकरणे आपल्याकडे स्थाननिश्चितीसाठी प्रलंबित असतील त्या प्रकरणांचा देखील निपटारा करुन शिक्षकनिहाय व महाविद्यालयनिहाय ही मागणी नोंदवावयाची आहे. यासाठी संचालनालय स्तरावर खालील प्रमाणे कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| १. डॉ. के.एम. कुळकर्णी, सहसंचालक (मुख्यालय) | अध्यक्ष |
| २. श्री. एम.बी. ढेंगळे, प्रशासन अधिकारी | सदस्य |
| ३. श्री. बी.बी. सोनवणे, वरिष्ठ लिपिक | सदस्य |
| ४. श्री. बी.टी. डोणे, कनिष्ठ लिपिक | सदस्य |
| ५. श्री. ए.एम. भागवत, कनिष्ठ लिपिक | सदस्य |

सदर कक्षास आपण आपली मागणी कोणत्याही परिस्थितीमध्ये दिनांक २०/४/२००५ पर्यंत पाठवावयाची आहे किंवा समक्ष डॉ. के.एम. कुळकर्णी, सहसंचालक, मुख्यालय यांच्याकडे येऊन या कक्षाच्याद्वारे तपासून मंजूर करुन घ्यावयाची आहे. **नंतरच आपणास आपल्या विभागासाठी मे पेड इन जून वाढीव तरतूद देण्यात येईल व राज्यामध्ये कोणत्याही शिक्षकाचे अपूर्ण वेतन दिले जाणार नाही याची खबरदारी हे संचालनालय घेईल.** तसेच आपल्या स्तरावरुन आपण आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळवावे व सदर आदेशानुसार कार्यवाही करावी.

(डॉ. एस.एन. पठाण)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

# *महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन विलंबाने होणे*

*पहिले अधिवेशन २००५ : मंगळवार, दिनांक ५ एप्रिल, २००५ : महाराष्ट्र विधानपरिषद*

*माननीय सदस्य सर्वश्री प्रा. बी. टी. देशमुख, व्ही.यु. डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल. अैनापूरे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.*

**प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्रातील शेकडो महाविद्यालयांमध्ये अनेक महिन्यांचे पगार विलंबाने होणे, १९ महिन्याच्या महागाई भत्त्याच्या वाढीची रक्कम भविष्यनिर्वाह निधीमध्ये जमा न होणे, शासन निर्णय निर्गमित होऊनसुध्दा महागाई भत्त्याच्या ५० टक्के भाग मूळ वेतनात समाविष्ट करण्याची कारवाई पूर्ण होण्यास होत असलेला अक्षम्य विलंब, तात्पुरत्या, अस्थायी व पार्टटाईम अधिव्याख्यात्यांच्या थकबाकीची रक्कम अजून अदा न होणे, दिनांक २१ सप्टेंबर १९७७ च्या शासन निर्णयान्वये नियमित व वेळेवर वेतन करण्यासाठीच्या योजनेचे प्रमुख प्रशासक व देखरेख अधिकारी म्हणून संचालक यांचेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडण्यात उच्च शिक्षण संचालक यांना आलेले अपयश, आपले अपयश झाकण्यासाठी 'महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याची जबाबदारी संस्था प्रमुखांची असल्याचे' शासन निर्णयाच्या विरुध्द परिपत्रक दिनांक २३ फेब्रुवारी,२००५ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी काढणे, त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला तीव्र असंतोष, दिनांक १७ मार्च,२००५ रोजी किंवा त्या दरम्यान महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांनी उच्च शिक्षणमंत्री यांना एक निवेदन सादर करुन बेमुदत काम बंद आंदोलनासह धरणे, निदर्शने इत्यादी आंदोलनाचा सादर केलेला कार्यक्रम, उच्च शिक्षण संचालकांच्या बडतर्फीची करण्यात आलेली मागणी, शासन निर्णयाच्या विरोधात यापूर्वी अनेक कारवाया त्यांनी केल्याची उदाहरणे या निवेदनासोबतच्या आंदोलन ठरावामध्ये पुराव्यासह समाविष्ट असणे, 'स्टडी मटेरिअल' व शासन निर्णय यातील फरक न कळल्यामुळे दिनांक १७ जुलै,२००२ चे परिपत्रक संचालकांनी काढणे व पुढे ते परिपत्रक मागे घेऊन दिनांक ६ ऑगस्ट २००२ रोजी उच्च शिक्षण मंत्र्यांना विधानपरिषदेत त्यांच्या कृतीमुळे दिलगिरी व्यक्ती करावी लागणे, अधिव्याख्यात्यांना कंत्राटी नेमणुका देतांना २ वर्षासाठी नेमणुका देण्याची दिनांक २५ जुलै २००२ रोजीच्या शासन निर्णयात तरतूद असतांना एकच वर्षासाठी नेमणुका देण्याचे शासन निर्णय विरोधी आदेश उच्च शिक्षण संचालकांनी विपरित हेतूने निर्गमित करणे, नंतर ते आदेश मागे घ्यावे लागणे, (दिनांक २६ मे, २००४ ता.प्र.क्र.४१७७८) स्थाननिश्चिती समितीच्या बैठकीला हजर नसलेल्या सहसंचालकांनी विनाकारण प्रस्ताव रोखून ठेवण्याचे स्पष्ट झाल्यानंतरही संचालक या नात्याने त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागण्याचा देखावा करणे व विधानपरिषदेत दिनांक ११ जून २००४ रोजी लक्षवेधी सूचनेवरील निवेदनात/चर्चेत ही गोष्ट स्पष्ट होवून सुध्दा सहसंचालकांच्या अपकृत्यावर पांघरुण घालणे, निवड श्रेणीत स्थाननिश्चिती करतांना वरिष्ठ श्रेणीतील सेवा कमी पडत असेल तर अधिव्याख्यात्यांची एकूण सेवा

---

**अ.शा. पत्र क्रं. बीयूडी-२००४/वेतनेतर अनुदान/लेखा-२**

## *शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) : महाराष्ट्र राज्य, पुणे-१*

***दिनांक २७/१०/२००४***

प्रिय श्री.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एनजीसी/२००३/३५४/०३/मशि-३, दिनांक २३/९/२००३ नुसार अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील गत वर्षीच्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मान्य वेतन अनुदानावर ५ टक्के एवढी रक्कम ही वेतनेतर अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याबाबत अधिकचे मार्गदर्शन संचालनालयाने क्रमांक शिसं/उशि/म.रा. पुणे/वेतनेतर अनुदान/०४, दिनांक २७/७/०४ या पत्राद्वारे शासनाकडे मागितले होते. त्यावर दिनांक ५/१०/२००४ च्या पत्रान्वये शासनाने असे कळविले आहे की, **शासन निर्णयातील वेतनेतर अनुदान सूत्र दिनांक ३/१०/७९ चा शासन आदेश अद्यापही लागू असून त्यापैकी सदर शासन निर्णयातील केवळ वेतनेतर अनुदानसुत्रामध्ये शासनाने दिनांक २३/९/२००३ व १६/२/२००४ अन्वये बदल केला आहे.**

तेंव्हा शासनाचे दि. ५/१०/२००४ पत्रानुसार दि. २३/९/२००३ व दि. १६/२/२००४ नुसार आपण या बाबतीत आपल्या स्तरावर अनुदानित महाविद्यालयांना वेतनेतर अनुदानाचा पहिला हप्ता अग्रिम देण्याबाबतचे आदेश आपल्या स्तरावरुन त्वरित निर्गमित करावेत व सदर वेतनेतर अनुदान महाविद्यालयांना दिवाळी पूर्वी देता येईल असे पहावे.

गतवर्षीच्या एकूण मान्य शिक्षक शिक्षकेतर वेतन अनुदानावर ५ टक्के रक्कम वेतनेतर अनुदानापैकी पहिला अग्रिम हप्ता हा ५० टक्के रकमेचा आपल्या स्तरावरून काढण्यात यावा व आपल्या सदर आदेशाची प्रत त्वरित संचालनालयाला पाठवावी. म्हणजे सदर अधिकच्या मागणीसाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव शासनाकडे करणे शक्य होईल.

महाविद्यालये शैक्षणिक शुल्क हे त्यांच्या वेतन अनुदान खात्यामध्ये जमा करतात. याखात्यातून हा सदरचा पहिला हप्ता घेण्यासंबंधी महाविद्यालयांना आपल्या आदेशामध्ये सुस्पष्ट सूचना देण्यात याव्यात. **ज्या महाविद्यालयांकडे शैक्षणिक शुल्कापोटी पुरेशी रक्कम जमा झालेली नाही अशा महाविद्यालयांनी पहिला अग्रिम हप्ता आपल्या आदेशाद्वारे वेतन अनुदानातून काढावयाचा आहे.** त्यामुळे सदर महाविद्यालयास वेतनाची रक्कम कमी पडण्याची शक्यता आहे. अशा महाविद्यालयांसाठी सहसंचालकांना वेतन अनुदान वाढवून द्यावे लागेल. परंतु हे करीत असतांना अत्यंत काळजीपूर्वक ह्या बाबी स्वतः हाताळाव्यात परंतु कोणत्याही प्रकारे सदर महाविद्यालयांना शासनाच्या अनुदानाची जास्तीची रक्कम जाणार नाही याची खबरदारी घ्यावी व तेवढ्या एकूण जास्तीच्या अनुदानाची संचालनालयाकडे मागणी करावी त्याप्रमाणे ती रक्कम संचालनालयाकडून वाढवून देण्यात येईल.

ज्या महाविद्यालयांकडे शैक्षणिक शुल्कातून वेतनेतर अनुदान घेतल्यानंतर जे शैक्षणिक शुल्क शिल्लक राहील ती रक्कम वर्ष अखेरीस महाविद्यालयाच्या वेतन अनुदानापोटी समायोजित करण्यात यावी. सदर आदेशाची आपल्या स्तरावरुन त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी व अनुपालन अहवाल पुरवणी मागणीसाठी वैयक्तीक लक्ष घालून संचालनालयास पाठवून द्यावा.

आपल्या स्नेहांकित

**(डॉ. एस.एन. पठाण)**

विभागीय शिक्षण सहसंचालक
उच्च शिक्षण विभाग

मोजण्यात यावी अशी स्पष्ट तरतूद १९९८ च्या युजीसीच्या नोटीफिकेशनमध्ये व दिनांक ११ डिसेंबर १९९९ च्या शासन निर्णयामध्ये असतांना संचालकांनी दिनांक १४ फेब्रुवारी २००२ रोजी त्याच्या विरोधात परिपत्रक काढणे, ही गोष्ट लक्षात आणून दिली असतांना शासनाला टाळून परस्पर विद्यापीठ अनुदान आयोगाकडे विषय पाठवून शेकडो शिक्षकांना शासन निर्णयातील लाभापासून वंचित ठेवणे, असे करतांना काही निवडक व्यक्तींना ह्या सवलतीचा फायदा देणे, दिनांक १२ नोव्हेंबर २००३ च्या शासन पत्रान्वये रजा विषयक तरतुदींचा तुलनात्मक तक्ता सादर करण्याचे आदेश असतांना, समज कमी असल्यामुळे किंवा शिक्षकांविषयीच्या आकसामुळे "शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या रजा शिक्षकांना लागू करण्याची विनंती करणारा" प्रस्ताव संचालकांनी सादर करणे, त्यातून झालेली कृती मागे घेण्याचे दिनांक १५ फेब्रुवारी,२००५ चे परिपत्रक काढण्याचा नामुष्कीचा प्रसंग शासनावर येणे, कामाचा समज नसल्यामुळे पाचव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीचे व थकबाकीचे नमुने वारंवार बदलविण्याची पाळी संचालकांवर येणे, दिनांक ७ डिसेंबर २००० रोजी शासनाला ही गोष्ट कबूल करावी लागणे, वेतनेत्तर अनुदान वितरित करण्यात त्यांच्याकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे एकूणच उच्च शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**श्री. दिलीप वळसे पाटील ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री )** : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

**मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे निवेदन**

उच्च शिक्षण संचालकांकडून विभागीय शिक्षण सहसंचालकांकडे संबंधित महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वेतन अनुदानाची तरतूद वितरित करण्यात येते. मुंबई विभाग वगळता अन्य विभागात वेतन वेळेवर होते. मुंबई विभागात काही वेळेला तांत्रिक आक्षेपास्तव देयके मान्य होण्यास विलंब होतो. **संचालक, कोषागारे यांना वेतन अनुदानाची बिले वेळेवर मंजूर**

## महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) : महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web:www.dirhe.org : E-mail:dirhe@pn2.vsnl.net.in (०२०) २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ : फॅक्स नं. ०२०/२६११११५३

*क्रं. उशिसं/२००५/परीप/स्थाननिश्चिती/मवि-१ : दि. २८.३.२००५ : परिपत्रक*

प्रति,
राज्यातील सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

**विषय :- महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या निवड समिती व स्थाननिश्चिती समितीवर प्रतिनिधी म्हणुन करावयाच्या नेमणुकाबाबत.**

शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी/१२००/७३३९३/(१५/००)/विशि-४, दिनांक १७/४/२००० नुसार महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या निवड समितीच्या बैठकीस अथवा वरीष्ठश्रेणी व निवडश्रेणीच्या ज्या निवड समित्यांच्या बैठका होतात त्या बैठकीमध्ये संचालकांचे प्रतिनिधी म्हणून शासनाचे वतीने कधी कधी आपण तर कधी कधी शासकीय महाविद्यालयाचे शिक्षक उपस्थित असतात. परंतु असे निदर्शनास आले आहे की, **बऱ्याच वेळेला या निवड समितीवर सहसंचालक हे स्वतः उपस्थित राहतात व त्यामुळे त्यांचेकडून नियमित कामाकडे दुर्लक्ष होते.** अशा प्रकारच्या काही विभागातुन तक्रारी आलेल्या आहेत. तसेच कधी कधी निवड समित्यांच्या बैठकांना सहसंचालक उपस्थित रहात नाहीत व मग कधीकधी त्या निवड समितीचे निवडीस मान्यता देण्यासंबंधी सहसंचालक कार्यालयाकडुन टाळाटाळ होते तर **कधीकधी अशा निवड समितीच्या अहवालावर महाविद्यालयांचे प्राचार्यांना स्वतः सहसंचालकाकडे जाऊन त्यावर सही घ्यावी लागते. अशी कृती करणे हे बेकायदेशीर व चुकीचे आहे.** त्यामुळे याबाबतीत या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व विभागीय सहसंचालकांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. दिनांक १ एप्रिल, २००५ पासून महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या निवड समितीच्या अथवा स्थाननिश्चिती समितीच्या बैठकांस सहसंचालकांनी स्वतः उपस्थित राहू नये. दिनांक १ एप्रिल, २००५ नंतर काही निवड समितीच्या बैठका निश्चित झालेल्या असल्या तर त्यामध्ये देखील या परिपत्रकानुसार बदल करण्यात यावा.

२. आपल्या विभागात असलेल्या शासकीय महाविद्यालयातील ज्येष्ठ अधिव्याख्यात्यांच्या नावाचे पॅनेल संचालनालयाकडून १ एप्रिल, २००५ रोजी आपल्या कार्यालयाकडे पाठविण्यात येईल.

३. महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या स्थाननिश्चिती/निवडसमितीच्या बैठकांसाठी शासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्याता/रिडर/प्राध्यापक यांना आपल्या स्तरावरून नामनिर्देशित करावे व हे करत असतांना पॅनेलमधील सर्व प्राध्यापकांना समान संधी द्यावी. एकाच प्राध्यापकांस अनेक बैठकांसाठी नामनिर्देशित करु नये. सदरचे अधिव्याख्याते/रिडर/प्राध्यापक हे संचालकांचे प्रतिनिधी म्हणुन त्या बैठकांना उपस्थित राहतील असे पहावे. त्यांनी शासनाचे प्रतिनिधी म्हणुन गुणवत्तेच्या आधारावर निर्णय घ्यावा असे निर्देश त्यांना आपल्या स्तरावरुन देण्यात यावेत.

४. स्थाननिश्चितीच्या बैठकांचे अहवाल सहसंचालक कार्यालयाकडे प्रलंबित राहतात याबाबतीत गंभीर तक्रारी आलेल्या आहेत. तेव्हा या परिपत्रकाव्दारे असे निर्देश देण्यात येत आहेत की, विभागीय सहसंचालक कार्यालयाकडे सदर प्रकरणे येताच शासन परिपत्रक क्रमांक मभाअ/२००२/ प्र.क्रं. ९६/२००२/५, दिनांक ३०/९/२००२ मधील मुद्दा क्रमांक ३ नुसार **१५ दिवसांच्या आत सकारात्मक अथवा नकारात्मक (गुणवत्तेनुसार जो निर्णय असेल तो) त्वरीत सहसंचालकांनी संबंधित प्राचार्यांना कळवावयाचा आहे. याबाबतीत विलंब झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.**

५. संचालकांचे प्रतिनिधी म्हणुन सदर समित्यांमध्ये काम करणारे अधिव्याख्याते/प्रपाठक/प्राध्यापक यांना संबंधित विद्यापीठाच्या/महाविद्यालयांच्या नियमाप्रमाणे त्या त्या महाविद्यालयाकडून प्रवासभाडे व दैनिक भत्ता हा नियमाप्रमाणे देय राहील.

६. आपल्या विभागात प्राचार्य पदाच्या निवड समितीमध्ये संचालकांचे प्रतिनिधी म्हणुन सहसंचालक यांनी स्वतः उपस्थित रहावे. त्यासाठी शासकीय महाविद्यालयांच्या अधिव्याख्यात्यांचे नामनिर्देशन करण्याची आवश्यकता नाही.

आपल्या विभागात स्थाननिश्चिती / निवड समितीबाबत तक्रारी येणार नाहीत याची दक्षता विभागीय सहसंचालकांनी घ्यावी. परंतु एखादी तक्रार आल्यास त्वरीत शिक्षण संचालकांना याबाबत स्वतः दुरध्वनीवरुन अवगत करावे. **शासनाच्या प्रतिनिधीचे काम नियमाप्रमाणे व अत्यंत पारदर्शकपणे करणे शासनास अपेक्षित आहे.**

वरील मार्गदर्शक सुचनांची आपल्या विभागाकडून काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

शिक्षण संचालक (उ.शि.)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**करण्याची विनंती संचालक स्तरावरून करण्यात आलेली आहे.**

महागाई भत्त्याच्या वाढीची जी रक्कम भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करावयाची आहे, त्यासाठी आवश्यक ती तरतूद करणे आवश्यक असते. त्यादृष्टीने नियमित अर्थसंकल्पात तसेच सुधारित अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तथापि, पुरेशी तरतूद उपलब्ध होऊ शकली नाही. **सदर रक्कम उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.** शासनाच्या दि. ४.११.२००४ च्या आदेशाच्या अनुषंगाने शिक्षण संचालकांनी त्यांच्या दि. ९.११.२००४ च्या पत्रान्वये सर्व विभागीय सहसंचालकांना ५० टक्के महागाई भत्ता वेतनामध्ये समाविष्ठ करण्याचे आदेश दिलेले आहेत. ऑक्टोबर, २००४ च्या वेतनात संचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या तरतूदी विचारात घेऊन ५ टक्के वाढ देण्यात आली होती. त्यानुसार काही महाविद्यालयामध्ये ५० टक्के महागाई भत्ता समाविष्ठ करुन वेतन देण्यात आलेले आहे. परंतु, तरतूदीअभावी काही महाविद्यालयात महागाई भत्ता समाविष्ठ करुन वेतन देता आलेले नाही. **उर्वरित महाविद्यालयांना देखील ५० टक्के महागाई भत्ता समाविष्ठ करुन वेतन देण्याची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.**

जानेवारी २००५ चे वेतन अनुदान सर्व अनुदानित महाविद्यालयांना वितरित करण्यासाठी अपूरे पडत असल्याने उच्च शिक्षण संचालकांनी दिनांक २३.२.२००५ रोजी परिपत्रक काढून शैक्षणिक संस्थांना अपूरी पडणारी तरतूद उपलब्ध करुन शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत सूचना दिल्या होत्या सर्व शिक्षकांना वेतन मिळावे या उद्देशाने हे परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. तथापि, या परिपत्रकामुळे गैरसमज निर्माण झाल्यामुळे, **सदर पत्र दिनांक २८.३.२००५ च्या परिपत्रकान्वये रद्द करण्यात आले आहे.** सद्यःस्थितीत सर्व महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे जानेवारी २००५ चे वेतन अदा करण्यात आले आहे. फेब्रुवारी महिन्याच्या वेतनाच्या जवळजवळ ८० टक्के तरतूद वितरित करण्यात आली आहे.

अध्यक्ष व सचिव, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी अॅन्ड कॉलेज टिचर्स ऑर्गनायझेशन यांनी दिनांक १७ मार्च २००५ रोजी मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक २८.३.२००५ रोजी शिवाजी युनिर्व्हसिटी टिचर्स असो. या संघटनेबरोबर बोलणी केली असून **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघास बोलणी करण्यासाठी निमंत्रित केलेले आहे.**

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग दिनांक २५.७.२००५ अन्वये विभागातील पदांचा आढावा जोपर्यन्त पूर्ण होत नाही, तोपर्यन्त शिक्षकीय रिक्त पदांच्या २/३ पदे दोन वर्षाकरीता किंवा आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त कंत्राटी स्वरुपात नियुक्त्या करुन भरता येतात. तथापि, शासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्याता पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात. त्यामुळे शासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्याता पदावर एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्त्या देता येत नाहीत. म्हणून शासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्याता पदावर एक वर्षाकरीता कंत्राटी पद्धतीने नियुक्त्या देण्यात येत होत्या. परंतु शासन पत्र दिनांक १४ जुलै, २००४ अन्वये जास्तीत जास्त दोन वर्ष किंवा लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त कंत्राटीपद्धतीने शासकीय महाविद्यालयात अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्या देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

स्थाननिश्चितीच्या बैठकी संदर्भात नागपूर विभागीय कार्यालयाकडून झालेल्या प्रकाराची चौकशी करण्यात येत असून नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल. **या संदर्भात स्थाननिश्चिती अथवा निवडश्रेणीची प्रकरणे विभागीय कार्यालयात प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत त्यावर सकारात्मक अथवा नकारात्मक जो काही निर्णय असेल तो विभागीय सहसंचालकांनी घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.**

शासन निर्णय दिनांक ११.१२.१९९९ अनुसार निवडश्रेणी देतांना वरिष्ठ श्रेणीमध्ये पाच वर्षे सेवा व वरिष्ठश्रेणी देतांना अधिव्याख्यातापदावर सहा वर्ष सेवा असण्याबाबत तरतूद आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे परिपत्रक एप्रिल २००० मधील क्लॉज क्रं. २.८.० मध्ये प्राध्यापक पदावर पदोन्नतीसाठी अनुज्ञेय होण्याकरीता जी तरतूद करण्यात आली आहे ती अधिक सुस्पष्ट होण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे संचालकांनी दिनांक १७ मार्च, २००४ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविलेले आहे व या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाकडे शासनाकडूनही पाठपूरावा करण्यात येत आहे.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ज्याप्रमाणे रजा अनुज्ञेय आहेत, तशाच रजा महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देण्याचा प्रस्ताव संचालक (उच्च शिक्षण) यांनी सादर केला होता. या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेल्या रजेबाबतच्या तरतूदी, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सध्या अनुज्ञेय असलेल्या तरतूदी आणि विविध विद्यापीठांनी त्यांच्या परिनियमान्वये रजेबाबत केलेल्या तरतूदी यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन प्रस्ताव सादर करण्याचे आदेश संचालकांना दिलेले आहेत. **मध्यंतरीच्या काळात शासनाने १५ फेब्रुवारी, २००५ च्या पत्रान्वये या शिक्षकांना संबंधित विद्यापीठांनी पूर्वी लागू केलेले रजेचे नियम लागू राहतील असे कळविण्यात आले आहे.**

## *महाराष्ट्र शासन*
## *शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) : महाराष्ट्र राज्य,*
## *मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१*

Web:www.dirhe.org : E-mail:dirhe@pn2.vsnl.net.in (०२०) २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ : फॅक्स नं. ०२०/२६१११९५३

*क्रं. उशिसं/२००५/परीप/वे.अ./मवि-१ : दि. २८.३.२००५ : परिपत्रक*

प्रति,

राज्यातील सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

**विषय :- अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व विधी आणि अध्यापक महाविद्यालयाचे वेतन अनुदानाबाबत**

सन २००४ व २००५ या शैक्षणिक वर्षासाठी वित्त विभागाकडून संचालनालयास उपलब्ध झालेली तरतुद अपूरी पडल्यामुळे माहे जानेवारी, २००५ च्या पगारासाठी १०० टक्के आवश्यक अनुदान संचालनालय खाजगी अनुदानित महाविद्यालयांना उपलब्ध करुन देऊ शकले नाही व त्यामुळे संचालकांनी खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे वेतन अनुदानासंबंधी क्रमांक बीयुडी/२००४/६७८९०/आ.त./लेखा-२, दिनांक २३/२/२००५ रोजी एक परिपत्रक काढले होते. संचालनालय या पत्राद्वारे आता सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना कळवित आहे की, **सदरचे परिपत्रक रद्द समजण्यात यावे.**

शासन निर्णय व युवक सेवा विभाग क्रमांक एनजीसी/१२७७/१२२१६६/३२(सेल), दिनांक २१/९/१९७७ च्या शासन निर्णयाचा हवाला देऊन अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील **शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन देण्याची जबाबदारी संस्था प्रमुखांची आहे असे जे म्हटले होते ते वाक्य परत घेण्यात येत असून त्याऐवजी** उपलब्ध झालेल्या शासन अनुदानानुसार वेतन अदा करण्यात येईल असे स्पष्टीकरण या पत्राद्वारे करण्यात येत आहे.

शिक्षकांचे १०० टक्के पगार व्हावेत अशा हेतुने शिक्षण संचालकांनी दिनांक २३/२/२००५ चे पत्र दिले होते परंतु शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा गैरसमज झालेला असल्याने **संचालनालय दिलगिर आहे आणि दिनांक २३/२/२००५ चे पत्र संचालनालयाकडून रद्द करण्यात येत आहे.** सुधारीत अंदाज मंजुर झाल्यानंतर माहे जानेवारी २००५ च्या वेतनासाठी कमी पडलेली तरतूद संचालनालयाचे पत्र क्रमांक बीयुडी/२००३/१२३४५/आ.त./लेखा-२, दिनांक २२/३/२००५ नुसार सर्व विभागीय सहसंचालकांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

आपले स्तरावरुन सदर बाब संबंधितांचे त्वरीत निदर्शनास आणून द्यावी.

**शिक्षण संचालक (उ.शि.)**
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पाचव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे नमुने वारंवार बदलण्यात आलेले नव्हते, तर सोयीच्या दृष्टीने एक रकाना बदलण्यात आलेला आहे. दि. ७ डिसेंबर, २००० अखेर थकबाकीच्या रकमेचे मंजूरीचे आदेश निर्गमीत करुन रक्कम संबंधित महाविद्यालयांना देण्यात आलेली होती व फेब्रुवारी २००१ पर्यन्त ज्या महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त होते त्यांना थकबाकी अदा करण्यात आली होती. त्यामुळे वारंवार तक्ते बदलल्यामुळे शिक्षकांना थकबाकी देण्यात अडचणी आल्या असे म्हणता येणार नाही.

अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मान्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शासनाकडून महाविद्यालयाला जे वेतन अनुदान दिले जाते, त्या वेतन अनुदानाच्या ५ टक्के इतका निधी वेतनेतर अनुदान म्हणून देण्याचा निर्णय शासनाने दि. २३ सप्टेंबर, २००३ अन्वये घेतला आहे. तथापि, शासनाच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे वेतनेतर अनुदान वितरित करण्यासाठी **चालू आर्थिक वर्षामध्येसुद्धा वेतनेतर अनुदानासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद करता आलेली नाही.**

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, या निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे उच्च शिक्षण संचालकांनी दि.२३-२-२००५ रोजी जे परिपत्रक काढले होते, ते दि.२८-३-२००५ रोजी त्यांनी स्वतःच रद्द केलेले आहे आणि त्यांनी तसे परिपत्रकसुद्धा पाठविले आहे. तसेच त्याबद्दल त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली आहे. त्यामुळे त्याबद्दल मी आता प्रश्न विचारु इच्छित नाही. पण निवेदनात म्हटलेले आहे की, "काही महाविद्यालयांमध्ये ५० टक्के महागाई भत्ता समाविष्ट करुन वेतन देण्यात आलेले आहे. परंतु, तरतूदीअभावी काही महाविद्यालयात महागाई भत्ता समाविष्ट करुन वेतन देता आलेले नाही." तशाच प्रकारची बाब १९ महिन्याचा वाढीव महागाईभत्ता भविष्य निर्वाह निधीत जमा करण्याच्या बाबतीत आणि वेतनाच्या बाबतीत आहे. म्हणजे एकेका महाविद्यालयाच्या माणसांनी जायचे आणि आपले काम करुन घ्यायचे, अशी पद्धती आहे काय? ही पध्दत बरोबर नाही. संचालकांचे काही नियंत्रण आहे की नाही? माझे ठामपणे असे म्हणणे आहे की, त्यांनी ५० टक्के महागाई भत्ता समाविष्ट करण्याचे पत्रक वगैरे काढलेले आहे. खरे म्हणजे आम्ही सभागृहात भांडलो आणि माननीय वित्त मंत्र्यांना सांगितले की, याबाबतीत वेगवेगळया विभागाने आदेश काढण्यापेक्षा तुम्ही सर्व विभागासाठी एकत्र आदेश काढा आणि त्यांनी त्याप्रमाणे आदेश काढले. ४-११-२००४ लाच त्यांनी शासननिर्णय काढला. त्यांनतर ९-११-२००४ ला उच्च शिक्षण संचालकांनी आदेश काढले. त्याची काही ठिकाणी अंमलबजावणी झाली आणि काही ठिकाणी झालेली नाही. हे योग्य आहे काय? म्हणून माझे असे म्हणणे आहे की, ५० टक्के महागाई भत्ता वेतनात समाविष्ट करणे, महागाई भत्त्याच्या रकमा भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा करणे आणि महिना-दोन महिन्याचे जे वेतन थकीत राहिलेले असेल ते अदा करणे अशा तीनही बाबी मिळून, नियमित झाले पाहिजे. निवेदनात नक्की तारीख दिलेली नाही. म्हणून माझे म्हणणे आहे की, एप्रिल पेड इन मे किंवा मे पेड इन जून मध्ये हे सर्व रेग्युलराईज होईल यादृष्टीने आपण त्यांना स्पष्ट आदेश देणार आहात का ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, एकदा राज्य शासनाने निर्णय घेतल्यानंतर कर्मचाऱ्यांना किंवा शिक्षकांना लाभ द्यावयाचे असतील तर त्यासंदर्भात सहसंचालक स्तरावर संस्था चालकांना किंवा शिक्षकांना आपापले प्रस्ताव मान्य करुन घ्यावे लागू नयेत हे अभिप्रेत आहे. म्हणून

## *महाराष्ट्र शासन*
## *शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) : महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१*

Web:www.dirhe.org : E-mail:dirhe@pn2.vsnl.net.in (०२०) २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ : फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

### *क्रं. उशिसं/परीप/२००५/अनु/विशि-१ : दि. २८.३.२००५ : परिपत्रक*

प्रति,
राज्यातील सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

**विषय :- खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाढीव पूर्ण वेतन देण्याबाबत**

सन २००४-०५ या आर्थिक वर्षामध्ये हिवाळी अधिवेशनामध्ये संचालनालयाने खालील पुरवणी मागण्या प्रस्तावित केलेल्या होत्या.

१. वरिष्ठ व निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चितीमधील फरक : रु. २६.९६ कोटी

२. १९ महिन्यांचा महागाई भत्ता जीपीएफ मध्ये जमा करणे : रु. २६.९८ कोटी

३. वाढीव महागाई भत्ता व ५० महागाई भत्ता मुळ वेतनात समाविष्ट करणे : रु. ३८.०२ कोटी

४. वेतनेत्तर अनुदान : रु. ३५.१९ कोटी

एकूण : रु. ११९.१३ कोटी

परंतु वित्त विभागाने वरील पुरवणी मागण्या मंजूर न करता ही रक्कम सुधारीत अंदाजपत्रकात वाढवून देऊ असे सांगितले. तथापि, सदर पुरवणी मागण्या मंजूर झालेल्या नाहीत. त्यामुळे सन २००४-०५ मध्ये एकुण ७६ कोटीची तरतूद ही कमी मिळाली. **त्याशिवाय ५ टक्के वेत्तनेत्तर अनुदान हे वेतन अनुदानामधून काढून घेण्याबाबतचा निर्णय शासन निर्णय क्रं. एनजीसी/२००३/(३५४/०३)/मशि-३, दिनांक २३.९.२००३ व १६.२.२००४ नुसार झालेला असल्याने काही महाविद्यालयांनी वेतन अनुदानातुन वेतनेत्तर अनुदान काढुन घेतले.** त्यामुळे महाविद्यालयाकडे जमा होणाऱ्या शैक्षणिक शुल्कांचे वेतनासाठी समायोजन करता न आल्यामुळे माहे जानेवारी व फेब्रुवारी महिन्याकरीता वेतनासाठीची तरतुद अपूरी पडलेली आहे. त्यामुळे शासनाने वेळोवेळी मंजूर केलेला वाढीव महागाई भत्ता, ५० टक्के महागाई भत्त्याचे समावेशन करणे, १९ महिन्याचा महागाई भत्त्याचा फरक जी.पी.एफ. मध्ये जमा करणे, या गोष्टी महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना देता आलेल्या नाहीत. ही वस्तुस्थिती आहे म्हणून वेळोवेळी मान्य केलेला वाढीव महागाई भत्ता व इतर अनुषंगिक बाबी देण्याकरीता संचालनालयाने खालीलप्रमाणे योजना आखलेली आहे व त्यांची अंमलबजावणी विभागीय सहसंचालक यांनी करावयाची आहे.

१. प्रत्येक विभागीय सहसंचालक कार्यालयानी वेतन वाटप कक्ष (Salary Distribution Cell) स्थापन करावयाचा आहे. या कक्षासाठी १ प्रशासन अधिकारी व ३ लिपीक कर्मचारी यांनी काम पहावे व हा कक्ष सहसंचालक यांचे अधिपत्याखाली कार्यरत राहील.

२. संचालनालयाच्या स्तरावर सहसंचालक (मुख्यालय) यांचे अध्यक्षतेखाली देखील एक वेतन अनुदान वाटप कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे.

३. दिनांक १ एप्रिल, २००५ पासून प्रत्येक महाविद्यालयास वाढीव महागाई भत्ता, ५० टक्के महागाई भत्त्यांचे समावेशन करणे व स्थाननिश्चितीमुळे झालेली सुधारीत वेतनश्रेणी याप्रमाणे महाविद्यालयास किती अनुदान देय होते त्यानुसार विभागीय सहसंचालकांनी आपल्या एकूण देय वेतन अनुदानाच्या रक्कमेबाबतची महाविद्यालयनिहाय माहिती तयार करावी व त्यास संचालनालयाने नेमलेल्या कक्षाची मान्यता घेऊन २० एप्रिल, २००५ पर्यंत माहिती संचालनालयास सादर करावी.

४. विभागीय सहसंचालकांचे वरील माहितीनुसार माहे मे महिन्याचे वेतन जुन महिन्यात अदा करण्यासाठी वेतन अनुदानाची तरतुद राज्यातील सर्व विभागीय सहसंचालकांना उपलब्ध करुन देण्यात येईल व **त्यानुसार माहे मे पासुन राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पूर्ण वेतन अनुदानासाठी आवश्यक तरतुद देण्यात येईल.**

५. १९ महिन्यांचा महागाई भत्ता जी.पी.एफ. मध्ये जमा करण्यासाठी रुपये २६.९८ कोटींची तरतुद माहे मे महिन्यात देण्यात येईल.

वरील सुचनांची विभागीय सहसंचालकस्तरावरुन काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व राज्यातील खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पुर्ण वेतन माहे मे पासून देण्यासंबंधी राज्यामध्ये आपण आपल्या स्तरावरुन आग्रही रहावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**शिक्षण संचालक** (उ. शि.)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

अशा प्रकारच्या काही घटना निदर्शनास आल्या असतील, तसेच सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे जेथे जाणीवपूर्वक किंवा काही हेतू मनामध्ये ठेऊन काही होत असेल तर अशा बाबी आपण शासनाच्या लक्षात आणून दिल्या तर संबंधित सहसंचालकांविरुध्द कारवाई करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे की, शासनाने जो निर्णय घेतलेला आहे, त्याप्रमाणे जे द्यावयाचे राहीलेले आहे, **ते जूनच्या पगारात क्लीअर करण्यात येईल.**

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, ही सर्व देणी नियमित करण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी आता उत्तरात जून महिना सांगितल्यामुळे मी त्या मुद्यावर काही बोलत नाही. पण यामध्ये एक अत्यंत गंभीर प्रश्न आहे. केंद्राची व यु.जी.सी. ची योजना अंमलात आणण्याचा मंत्रीमंडळाने निर्णय घेतला, स्वतः माननीय मंत्री महोदय त्यावेळी तेथे होते. यामध्ये दिलेले आहे की, “विद्यापीठ अनुदान आयोगाचे परिपत्रक एप्रिल २००० मधील क्लॉज क्र.२.८ मध्ये प्राध्यापक पदावर पदोन्नतीसाठी अनुज्ञेय होण्याकरीता जी तरतूद करण्यात आली आहे. त्याबाबत मार्गदर्शन मागितले आहे” आम्ही लक्षवेधी सूचनेमध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, “निवड श्रेणीत स्थाननिश्चिती करताना वरिष्ठ श्रेणीतील सेवा कमी पडत असेल तर अधिव्याख्यात्यांची एकूण सेवा मोजण्यात यावी अशी स्पष्ट तरतूद २४ डिसेंबर,१९९८ च्या यूजीसीच्या नोटीफिकीशेनमध्ये आहे.” हे नोटीफिकेशन मंत्रीमंडळाने अंमलात आणण्याचे मान्य केले आहे. त्याप्रमाणे ११ डिसेंबर १९९९ ला शासन निर्णय निघाला आहे. २४ डिसेंबर,१९९८ च्या यूजीसी नोटीफिकेशन मध्ये पॅरिग्राफचे नंबरींग कन्टीन्युअस आहे. पण आपल्या शासन निर्णयामध्ये परिच्छेद नंबरिंग न करता ते सारे ‘प्रोफेसर’च्या खाली टाकण्यात आले आहे. रिफ्रेशर कोर्सला आणि फिडर केडरला वेगळा नंबर दिलेला नाही. परंतु रिफ्रेशर कोर्स हे लागू केले, पण एकूण सेवा धरण्याची तरतुद लागू केली नाही. नंतर १४ फेब्रुवारी २००२ मध्ये यूजीसीच्या

*क्रं. उशिसं/२००५/लेखा -२*

## *शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) : महाराष्ट्र राज्य, पुणे-१*

### डॉ. एस.एन.पठाण, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)

*दि. ११.४.२००५ : परिपत्रक*

प्रति,
राज्यातील सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

**विषय :-खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे एक तारखेस वेतन देणे बाबत.**

वित्त विभागाच्या मार्गदर्शक सुचनानुसार खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक महिन्याच्या वेतनासाठी आपल्या मागणीनुसार आवश्यक तेवढे अनुदान या संचालनालयाकडून दिले जाते **परंतु शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मात्र १ तारखेस वेतन मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. या बाबतीमध्ये संचालनालय अथवा विभागीय सहसंचालक कार्यालय यांच्या स्तरावर येथून पुढे हलगर्जीपणा होता कामा नये** यासाठी खालील प्रमाणे कार्यक्रम देण्यात येत आहे. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी या बाबतीमध्ये एक तारखेला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेतन देणे बाबत सभागृहामध्ये आश्वासन दिले आहे व त्यामुळे याबाबतीत संचालनालय अथवा विभागीय सहसंचालक कार्यालय यांच्या स्तरावर हलगर्जीपणा जर झाला व **त्यामुळे वेतनास विलंब झाला तर संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. संबंधित कर्मचारी अथवा अधिकाऱ्यावर कामात कसूर केल्यामुळे निलंबनाची देखील कारवाई होऊ शकते, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.** एक तारखेला वेतन देण्याबाबत खालील प्रकारे सुचना देण्यात येत आहेत.

१. ज्या महिन्याचे वेतन द्यावयाचे आहे, त्या महिन्याच्या एक महिन्यापूर्वी संचालनालयस्तर अथवा विभागीय सहसंचालक स्तरावर कार्यवाही सुरु करण्यात यावी.

२. संचालनालयस्तरावर पहिल्या आठवड्यात बजेट शाखेने म्हणजे श्री. भागवत यांनी टिप्पणी सादर करुन प्रशासन अधिकारी यांच्या शिफारशीने कोणत्याहि परिस्थितीमध्ये शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांची मंजूरी दिनांक ४ तारखेपर्यंत घेऊन, स्वाक्षरी घ्यावी व शिक्षण संचालकांच्या शाईच्या सहीचे आदेश हे दिनांक ५ तारखेस स्पीड पोस्टाने विभागीय सहसंचालक, यांचे कार्यालयास पाठवावेत.

३. संचालनालय स्तरावरुन हे काम वर विहित केलेल्या पध्दतीने चालते किंवा कसे यावर देखरेख ठेवण्याचे काम शिक्षण संचालकांच्या स्वीय सहाय्यक श्रीमती. दातीर ह्या करतील.

४. दिनांक १ ते दिनांक ४ पर्यंत शिक्षण संचालक दौऱ्यावर अथवा मुंबई येथे शासकीय बैठकीसाठी उपस्थित असल्यास त्यांचेशी संपर्क साधून आदेशावर सही घेण्याचे काम हे शिक्षण संचालकांच्या स्वीय सहाय्यक श्रीमती दातीर यांचे आहे.

५. विभागीय सहसंचालक कार्यालयास दुसऱ्या आठवड्यातील पहिल्या दोन ते तीन दिवसामध्ये शिक्षण संचालकांच्या शाईच्या सहीचे आदेश हे प्राप्त झाले पहिजेत, परंतु पोस्टल डिले व अन्य कारणामुळे आदेश प्राप्त न झाल्यास, आदेश प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी ही विभागीय सहसंचालक कार्यालयाची आहे. गरजेनुसार विभागीय सहसंचालक यांनी खास दुताकरवी हे आदेश प्राप्त करुन घेणे जरुरीचे आहे.

६. आदेश प्राप्त होताच दुसऱ्या आठवड्यामध्ये कोणत्याहि परिस्थितीमध्ये विभागीय सहसंचालकांनी सदर देयके मंजूरीसाठी कोषागारात जमा करणे आवश्यक आहे.

**७. ज्या विभागीय कार्यालयाकडून दुसऱ्या आठवड्यामध्ये कोषागारात देयके सादर होणार नाहीत. त्या विभागीय कार्यालयास कसूर म्हणून जबाबदार धरण्यात येईल.**

८. तीसऱ्या आठवड्यात कोषागारातून सदर देयके मंजूर होण्यामध्ये काही अडचणी आहेत असे निदर्शनास आल्यास विभागीय सहसंचालकांनी थेट डॉ. के.एम. कुळकर्णी, सहसंचालक (मुख्यालय) यांच्याशी संपर्क साधावा. ते स्वतः कोषागार अधिकाऱ्यांशी बोलून घेतील व कोषागार कार्यालयामध्ये देयके विलंबाने का मंजूर होत आहेत, याची माहिती स्वतः संचालकांना देतील व याबाबतीत शिक्षण संचालक थेट संचालक, कोषागारे यांच्याशी संपर्क साधतील परंतू तिसऱ्या आठवड्यात देयके मंजूर करुन घेणे ही विभागीय सहसंचालक कार्यालयाची जबाबदारी आहे.

९. चौथ्या आठवड्याच्या पहिल्या दिवशी शहरातील महाविद्यालयांचे चेक / पे ऑर्डर वितरीत करण्याचे काम विभागीय सहसंचालक यांनी करावे, तर शहराबाहेरील इतर जिल्ह्यासाठी व जिल्ह्यातील महाविद्यालयासाठी धनाकर्ष तीन ते चार दिवसात प्राप्त करुन घ्यावेत.

**१०. चौथ्या आठवड्याच्या चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी धनाकर्ष हे त्या त्या महाविद्यालयात पोहचतील अशा पद्धतीचे नियोजन विभागीय सहसंचालक कार्यालयाने करावे.**

वरील पद्धतीने कामाचे नियोजन देखरेख अधिकाऱ्याने करावे, म्हणजे राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एक तारखेस पगार देण्यात येईल याची खबरदारी घ्यावी.

शिक्षण संचालक स्तरावरुन जे कर्मचारी व अधिकारी आणि विभागीय सहसंचालक स्तरावरील कर्मचारी व अधिकारी यांनी अत्यंत सकारात्मक भावनेतून सदर काम हे कर्तव्य जबावदारी म्हणून पार पाडून मे पेड इन जून, जून पेड इन जुलै, जुलै पेड इन ऑगस्ट, ऑगस्ट पेट इन सप्टेंबर, सप्टेंबर पेड इन ऑक्टोबर, ऑक्टोबर पेड इन नोव्हेंबर, नोव्हेंबर पेड इन डिसेंबर, डिसेंबर पेड इन जानेवारी, याप्रमाणे एक तारखेला शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन करण्यात यावे.

जानेवारी व फेब्रुवारी महिन्याचे वेतन मात्र सुधारित अंदाजपत्रक मंजुरीनंतर करणे शक्य होईल.

मार्च व एप्रिल महिन्याचे वेतन मात्र लेखा अनुदान मंजूर झाल्यानंतरच करणे शक्य होईल.

शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन एक तारखेला देण्याबाबत संचालनालय व विभागीय सहसंचालक कार्यालयातील सर्व कर्मचारी कर्तव्य तत्परता दाखवतील याबाबत संचालनालयास कोणताही संदेह नाही.

**शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

नोटीफिकेशनच्या विरोधात, शासन निर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण संचालकांनी पत्रक काढले. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, १४ फेब्रुवारी २००२ ला जे पत्रक काढलेले आहे, ते ताबडतोब मागे घेतले पाहिजे आणि मंत्रिमंडळाने २४ डिसेंबर १९९८ रोजी चे विद्यापीठ अनुदान आयोगाचे जे नोटीफिकेशन मान्य केले आहे, ते नोटीफिकेशन लागू केले पाहिजे. जे शासन निर्णयात आले आहे, फक्त परिच्छेद नंबरींग करण्याची आवश्यकता आहे. तर त्याप्रमाणे करुन एकूण सेवा धरण्याची ही तरतूद ताबडतोब लागू केली जाईल का ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, नाही, मग मी . . . .

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन याचा अर्थ संचालकांनी जे परिपत्रक काढलेले आहे, ते मागे घेतले जाईल आणि यूजीसीच्या नोटीफिकेशन प्रमाणे मंत्रिमंडळाने जो निर्णय घेतला आहे, त्याप्रमाणे सुधारीत जी.आर.काढला जाईल. **सजेशन फॉर ॲक्शन म्हणजे तुमची सजेशन आम्ही मान्य करतो, असा त्याचा अर्थ आहे.**

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, आता माननीय मंत्री महोदयांनी जे सांगितले, त्यामुळे ते स्पष्ट झाले. त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचा आभारी आहे. माझे म्हणणे असे आहे की, आजच्या या लक्षवेधीमध्ये एवढया ॲक्ट्स् ऑफ ओमिशन आणि कमिशन्स आहेत की, ते सर्व सांगून सभागृहाचा वेळ घेणे मला योग्य वाटत नाही. नागपूरच्या सहसंचालकांच्या बाबतीत निवेदनात आलेले आहे. १५ दिवसात निर्णय घेण्याचे बंधन आता टाकण्यात आले आहे. हा आजचा तिसरा चांगला निर्णय आहे. हे मी स्पष्ट करु इच्छितो. त्याशिवाय इतक्या ॲक्ट्स् ओमीशन्स् ॲण्ड कमिशन्स् आहेत आणि सर्वांची येथे चर्चा करावयाची म्हटले तर वेळ जाईल. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, एम्फक्टो संघटनेने आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. दर महिन्यामध्ये दर सोमवारी जॉईंट डायरेक्टरच्या कार्यालयावर मोर्चा काढला जाणार, निदर्शने करणार. म्हणजे त्यांची जी कामे आहेत, त्यामध्ये त्यांना ही आंदोलनाची कामे करावी लागत आहेत. तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, या सर्व मुद्यांच्या बाबतीत त्या संघटनेशी चर्चा करुन निर्णय घ्यावा आणि हे महिन्या भरामध्ये करावे. आज महाराष्ट्रात जे वातावरण निर्माण झालेले आहे, ते योग्य नाही. माननीय मंत्री महोदयांनी आज जाहिर केलेले तिनही निर्णय अतिशय महत्वाचे आहेत. खरे म्हणजे हे मुळात घेतलेलेच निर्णय होते पण संचालकांनी अयोग्य केले होते. ते आपण आता पुन्हा योग्य मार्गावर ओढून आणले आहे. तेव्हा एक महिन्यात किंवा दीड महिन्यात तारीख देऊन संघटनेबरोबर चर्चा केली जाईल काय ? तसेच चर्चेनंतर उर्वरित प्रश्नांच्या बाबतीत शासन पातळीवर निर्णय घेतला जाईल काय ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे दोन विषय उपस्थित केलेले आहेत. पहिली बाब म्हणजे याठिकाणी त्यांनी बैठकीच्या संदर्भात मागणी केली आहे. तर यासंदर्भात महिनाभराच्या आत एक बैठक बोलावून सर्व संघटनांबरोबर चर्चा केली जाईल.

सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केला. लहान लहान प्रश्नाच्या बाबतीत सभागृहाचा फार वेळ जातो. त्याबाबत देखील मॅकॅनिझम तयार केले पाहिजे. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत मा.सदस्यांना सांगू इच्छितो की, असे लहानलहान प्रश्न लक्षवेधी किंवा प्रश्नाच्या माध्यमातून त्याची चर्चा सभागृहात करावयाची असेल तर त्याची चर्चा मंत्री किंवा सचिव यांच्याबरोबर झाल्याशिवाय अशाप्रकारचा प्रश्न किंवा लक्षवेधी स्वीकृत करु नये.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मा.मंत्री महोदय आपल्याला काही सूचना करीत आहेत.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** यामध्ये वेळ जाणार नाही हा हेतू आहे.

**डॉ..वसंत पवार :** सभापती महोदय, मी संस्था चालकांच्या वतीने बोलतो आहे. सभापती महोदय, दिनांक २३ फेब्रुवारी २००५ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी परिपत्रक काढलेले आहे. त्याप्रमाणे सर्व कर्मचाऱ्यांना वेतन देण्याची जबाबदारी संस्था प्रमुखांची आहे,असे म्हटलेले आहे. या परिपत्रकामुळे गैरसमज निर्माण झाले, चुकीचे आदेश काढल्याचे लक्षात आल्यानंतर २८-३-२००५ रोजी ते आदेश मागे घेतले. निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन दिले जाते, त्या वेतन अनुदानाच्या ५ टक्के इतका निधी वेतनेतर अनुदान म्हणून देण्याचा निर्णय शासनाने दिनांक २३ सप्टेंबर २००३ अन्वये घेतलेला आहे". अजूनही किती वेतनेतर अनुदान बाकी आहे आणि ते शासन केव्हा देणार आहे, हे मंत्री महोदयांनी सांगावे,अशी विनंती आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, ही बाब तपासून घेऊन एक महिन्याच्या आत त्याबाबतचा निर्णय घेतला जाईल.

**डॉ.अशोक मोडक :** सभापती महोदय, निवेदनाच्या पान २ मध्ये बजेटमध्ये तरतूद नव्हती असे म्हटलेले आहे. यामध्ये मला दोन ट्रेंड दिसतात. बजेट सरप्लस दाखविणे आणि ते पैसे दुसरीकडे खर्च करणे, दुसरे असे की, बजेटमध्ये तरतूद दाखवायची नाही आणि नंतर पूरक मागण्यांमध्ये ते पैसे मंजूर करुन घ्यावयाचे, असा ट्रेंड तर नाही ना, असा प्रश्न समोर

## *महाराष्ट्र शासन*
## *शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) : महाराष्ट्र राज्य,*
## *मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१*

*क्रं. उशिसं/२००५/परीप/अनु/मवि-१ : दि. ३०.३.२००५ : सुधारित परिपत्रक*

प्रति,

राज्यातील सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

**विषय :- खाजगी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाढीव पुर्ण वेतन देण्याबाबत**

खाजगी अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाढीव पूर्ण वेतन देण्याबाबत संचालनालयाचे समक्रमांकाचे दिनांक २८ मार्च, २००५ चे परिपत्रक पहावे. सदर परिपत्रकातील परिच्छेद दोनमधील ओळ क्रमांक ३ मध्ये **वेतन अनुदान** असे लिहीलेले आहे **त्याऐवजी जमा होणाऱ्या शिक्षण शुल्कातुन** असे वाचावे.

वेतन अनुदान व वेतनेत्तर अनुदान ही दोन्ही स्वतंत्र खाती आहेत. त्यामुळे शासन निर्णय क्रमांक एनजीसी/२००३/(३५४/०३)/मशि-३, दिनांक २३.९.२००३ च्या शासन आदेशान्वये दिनांक ३.१०.१९७९ च्या शासन आदेशातील सुत्रात बदल करण्यात आलेला आहे. तथापि, सदर आदेशातील इतर तरतुदी पूर्ववत आहेत. तसेच दिनांक १६.२.२००४ च्या आदेशानुसार शासनाने वेतनेत्तर अनुदान उपलब्धतेच्या संदर्भात स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यानुसार महाविद्यालयातील प्राचार्य जे वेतनेतर अनुदान घेणार आहेत त्याबाबतीत सहसंचालकांनी पुढील काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

१. वेतन खात्यात फी सकट जमा झालेली सर्व रक्कम वेतनाच्या कामासाठी वापरावयाची आहे सदर बाब आपण काळजीपूर्वक पहाणे आवश्यक आहे.

२. शासन निर्णय क्रमांक एनजीसी/२००३/(३५४/०३)/मशि-३, दिनांक १६.२.२००४ नुसार फीमधुन जमा झालेले उत्पन्न वेतनेत्तर खात्यात वर्ग करण्याबाबतीत संचालनालयाचे पत्र क्रमांक बीयुडी/२००४/वेतनेत्तर अनुदान/लेखा-२, दिनांक २२.०४.२००४ मधील निर्देशानुसार व सर्व विभागीय सहसंचालकांनी आपल्या स्तरावरुन दिलेल्या आदेशानुसार तेवढीच रक्कम महाविद्यालयातील प्राचार्यांना काढता येईल. विभागीय सहसंचालक यांचे आदेशाखेरीज महाविद्यालयाच्या प्राचार्यांना जमा होणारे शिक्षण शुल्क वेतनेत्तर खात्याकडे परस्पर वर्ग करणे हे बेकायदेशीर आहे व याबाबतीत सहसंचालकांनी त्यांचे स्तरावरुन संबंधितांना आवश्यक त्या सुचना द्याव्यात.

**शिक्षण संचालक** (उ.शि.)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

येतो. या संबंधाने गेल्यावर्षी किती तरतूद केलेली होती आणि या वर्षी किती तरतूद केलेली आहे, त्याबाबतचा खुलासा करावा, अशी विनंती आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** राज्याचे जे बजेट केले जाते, ते साधारणतः वेगवेगळे रिसोर्सेस गृहित धरून केले जाते. तेवढे पैसे उपलब्ध होत नव्हते याच कारणामुळे केवळ आपण राज्याचे बजेट या वर्षी लहान केले. १७-१८ हजार कोटी रुपयाचे बजेट स्प्लीट करुन तयार करावयाचे आणि नंतर त्यामध्ये कट लावायचा यामुळे प्रश्न निर्माण होतात. म्हणून या संदर्भात कोणत्याही परिस्थितीमध्ये मा.वित्तमंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे की, कॅश फ्लो च्या संदर्भात तरतूद केलेली आहे, ती निश्चित प्रकारे खर्च करावी. प्राधान्याच्या सेक्टरमध्ये पेमेंट करायला पाहिजे. या ठिकाणी सॅलरीचे अनुदान नॉन सॅलरीला दिले गेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सहसंचालकांनी अनुदान वितरित करताना ते दुसऱ्या बाबीवर खर्च करण्याची कृती झाली असेल तर सह संचालकांविरुध्द कारवाई करण्यात येईल. शासन स्तरावरच वेतनाची रक्कम प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याच्याबाबतीत सातत्याने दक्षता घेतली जाते. एखाद्या ठिकाणी खालचे अधिकारी चुकीचे वागतात, त्यामुळे हजारो कर्मचाऱ्यांना मनस्ताप सोसावा लागतो, त्याबरोबर सभागृहाचाही वेळ जातो. या गोष्टी थांबविण्यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील. त्याचबरोबर यापुढे संचालक किंवा सह संचालकांच्या किंवा अन्य कोणाच्या चुकीमुळे अशाप्रकारचा मनस्ताप भोगण्याची वेळ येणार नाही, या संदर्भात एक रचना तयार करुन सर्व शिक्षकांना वेळेवर पगार मिळेल असे आश्वासित करण्यात येत आहे.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** नागपूर विद्यापीठाच्या अंतर्गत सहसंचालक श्री.राठोड यांच्याबद्दल अनेक तक्रारी आलेल्या आहेत. ते पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाहीत अशा तक्रारी आहेत. नागपूर युनिव्हर्सिटीमध्ये या वर्षात स्थान निश्चितीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? १९९६ पासून भविष्यनिर्वाह निधीचा हिशेब दिलेला नाही. स्लीप दिलेल्या नाहीत. गेल्या दोन वर्षामध्ये या विद्यापीठाच्या अंतर्गत वेतन अनियमितपणे दिले जात आहे. तीन चार महिन्याचे वेतन एकदम दिले जाते. ते नियमित केले जाईल काय ? स्थान निश्चितीची जी प्रकरणे प्रलंबित आहेत त्यासंदर्भात एक महिन्यात निर्णय घेणार काय ? १९९६ पासून भविष्य निर्वाह निधीच्या हिशेबाच्या चिठ्ठ्या दिलेल्या नाहीत त्यासंदर्भात सुध्दा एक महिन्यात ठोस निर्णय घेऊन त्यांना दिलासा देणार काय ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, स्थान निश्चितीच्या संदर्भात सर्व संचालकांना आजच आदेश देण्यात येतील की, वाटेल त्या परिस्थितीमध्ये त्यांनी सर्व स्थान निश्चितीची प्रकरणे दोन महिन्याच्या आत पूर्ण करावीत. ज्या ज्या ठिकाणी रकमा देण्याच्या राहिलेल्या आहेत त्यासंदर्भात जी बैठक घेणार आहोत त्या बैठकीमध्ये चर्चा करुन ज्या ठिकाणी शक्य आहे त्या ठिकाणी दिल्या जातील.

**प्रा. बी. टी. देशमुख :** स्थान निश्चितीच्या बाबतीत पंधरा दिवसामध्ये ते केले पाहिजे असे सध्याचे आदेश आहेत.

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** ते आल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत केले पाहिजे परंतु थकलेली प्रकरणे असतील तर त्याचा निपटारा केला पाहिजे.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** भविष्य निर्वाह निधीच्या संदर्भात १९९६ पासून हिशेबाच्या चिठ्ठ्या दिलेल्या नाहीत. त्यासंदर्भात एक महिन्यात निर्णय घेणार काय ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** यासंदर्भात सर्व हिशेब ताबडतोबीने करुन घेण्याचे सांगण्यात येईल.

**श्री. जी. एल. अैनापुरे :** निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, अध्यक्ष व सचिव, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी ॲन्ड कॉलेज टिचर्स ऑर्गनायझेशन यांनी दिनांक १७ मार्च, २००५ रोजी माननीय मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक २८.३.२००५ रोजी शिवाजी युनिव्हर्सिटी टिचर्स असोसिएशन या संघटनेबरोबर बोलणी केली असून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघास बोलणी करण्यासाठी निमंत्रित केलेले आहे. परंतु अशाच इतर प्राध्यापकांच्या संघटना आहेत. त्यांनाही आपण चर्चेला बोलविणार काय ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** महाराष्ट्रामध्ये जेवढया संघटना असतील तेवढया संघटनांना बोलविण्यात येईल.

## वरिष्ठ श्रेणीतुन निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देतांना शासन निर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण संचालकांनी काढलेले परिपत्रक

*पहिले अधिवेशन २००५ : : महाराष्ट्र विधानपरिषद*
*गुरुवार, दिनांक ७ एप्रिल, २००५*

**(९) * १९२२ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते, प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४१७५४ ला दिनांक २ जून, २००४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करतांना वरिष्ठ श्रेणीमध्ये ५ वर्षाची सेवा झालेली नसली तरी एकूण सेवाकाळ विचारात घेऊन स्थाननिश्चिती करा अशी स्पष्ट तरतूद वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित केलेल्या दिनांक ११.१२.१९९९ च्या शासन निर्णयात असतांना वरिष्ठ श्रेणीची ५ वर्षे सेवा सक्तिची करणारे परिपत्रक उच्च शिक्षण संचालक यांनी दिनांक १४ फेब्रुवारी २००२ रोजी काढल्याने अनेक शिक्षक निवडश्रेणीपासून वंचित राहिले अशी तक्रार करणारे जे एक निवेदन नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या सचिव व सहसचिवांनी दिनांक ५ मार्च २००४ रोजी किवा त्यादरम्यान संचालक उच्च शिक्षण यांना, सादर केले होते त्या संदर्भात दिनांक २४.५.२००४ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मागितलेले स्पष्टीकरण शासनास प्राप्त झाले हे खरे आहे काय,

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २४ डिसेंबर, १९९८ च्या नोटीफीकेशनद्वारे व त्यानंतर अशाच सूचना वारंवार दिल्याची बाबसुध्दा या निवेदनाने शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे हे लक्षात घेता पुढील कारवाई करण्यास निश्चित अडचणी कोणत्या आहेत,

(३) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्पष्टीकरण प्राप्त होण्यास एवढा विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) अशा कारणांच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे ?

**श्री. सुरेश शेट्टी , श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्या करिता** (१) नाही.

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार वरिष्ठ श्रेणीतून निवड श्रेणी मिळण्यासाठी वरिष्ठ श्रेणीतील ५ वर्षाच्या सेवेची अट आहे. त्याचप्रमाणे ज्यांची फिडर केडरमध्ये ५ वर्षापेक्षा कमी सेवा झाली आहे. परंतु नियुक्तीच्या दिनांकापासून एकत्र सेवेचा कालावधी विहित सेवेपेक्षा जास्त झालेला असेल त्यांचेबाबत पुढील केडरमध्ये नियुक्ती देण्याबाबतही आयोगाचे मार्गदर्शक तत्व असल्याने याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्पष्टीकरण मागविलेले आहे. ते प्राप्त झालेले नाही.

(३) स्पष्टीकरण पाठविण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाला विनंती करण्यात आलेली आहे. आयोग हा केंद्र शासनाच्या अखत्यारीतील स्वायत्त आयोग असल्याने त्यांना विलंबाची कारणे विचारता येणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, याबाबत सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. यासंबंधात दिनांक ५.४.२००५ ला लक्षवेधीवरील चर्चेच्यावेळी माननीय मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांनी यासंबंधी आश्वासन दिलेले आहे. ते आश्वासन कायम राहील आणि आम्ही त्याचा पाठपुरावा करु.

**प्रा. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी त्यावेळी सरळसरळ असे म्हटले होते की, "उच्च शिक्षण संचालकांचे परिपत्रक मागे घेऊ आणि ही सवलत देणारे क्लॅरिफिकेशन निर्गमित करु." माझा आता प्रश्न असा आहे की, "संचालकांचे दिनांक १४-२-२००४ चे परिपत्रक मागे घेऊन निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करतांना वरिष्ठ श्रेणीमध्ये ५ वर्षाची सेवा झालेली नसली तरी एकूण सेवाकाळ विचारात घेऊन स्थाननिश्चिती करावी." असे हे क्लॅरिफिकेशन आठ दिवसात, पंधरा दिवसात निर्गमित होईल काय?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, पंधरा दिवसात यासंबंधीचे क्लॅरिफिकेशन निर्गमित करण्यात येईल.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

**ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

*(Regd. under Act. XXI of 1860)*

*403, Nanak Sai Residency, Abids,*

Lane Opp to Papaji Ka Dhaba, Hyderabad-500 001.

*Ph. & Fax: 040-24756914 Mobile: 9394556914 E-mail: aifucto@rediffmail.comWebsite: WWW. aifucto.org*

## C/4/2005 : DATED: 25-2-2005

TO ALL THE MEMBERS OF NATIONAL EXECUTIVE COMMITTEE & ALL AFFILIATED UNITS

### MEETING ON 22 - FEBRUARY 2005 WITH SHRI BASWAN, SECRETARY, HRD MINISTRY

At the request of the AIFUCTO, Shri B.S. Baswan, Secretary (Secondary & Higher Education) of the MHRD met the National Secretariat of the AI FUCTO on Tuesday, 22- February 2005 at New Delhi. The meeting lasted about two hours. The AIFUCTO delegation consisted of Prof. B. Vijay Kumar, General Secretary; Dr. V.K. Tiwari and Dr. C.R. Sadasivan both National Secretaries. From the Government of India, apart from Shri Baswan, Shri Om Prakash, Under Secretary (U.I. Section) and from the UGC, Prof. Ved Prakash, Secretary, and Shri Dogra, Joint Secretary attended the meeting. The AIFUCTO had earlier submitted explanatory Note on the Pending Issues dated 9th December 2004 after which a meeting with the HRD Minister Shri Arjun Singh had also taken place on 9, December 2004. The particulars about the said meetings have been already printed in earlier circulars.

At the outset, the AIFUCTO pointed out that in respect of the previous meeting held on 9th December 2004 where the Hon'ble Minister for HRD himself had also remained present and 10th December 2004, Minutes had not been sent to the AI FUCTO. Instead of the Minutes a letter was sent to the AIFUCTO by the under Secretary in the Ministry of HRD calling it as "decisions taken in the meeting". The AIFUCTO stated that Minutes should be prepared for such meeting and sent to the AIFUCTO as was the practice in the past. **The HRD Secretary stated that the AIFUCTO demand was correct and that Minutes should be prepared for all such meetings and circulated to all concerned as a mater of principle.**

**1. Third Promotion to University & College teachers:** In this connection the HRD Secretary enquired as to what the scale that was being demanded by the AIFUCTO as elongated scale beyond Rs.18,300. The AIFUCTO pointed out that the Professors scale was from Rs.. 22,400. The HRD Secretary stated that it could go up to Rs. 22,400. The HRD Secretary enquired whether information from Agricultural Ministry and other Research Institutions had been obtained. AIFUCTO pointed out that the scale of pay of teachers at the universities and Colleges were exclusive and it was not necessary to get any information from the Agricultural Ministry and other Research Institutions and that stagnation in the scale could be easily sorted out by elongated scale.

**2. Parity of DPEs and Librarians with teachers:** The HRD Secretary enquired as to where the matter stood after the last meeting when it was discussed and referred to a small group to clear the bottlenecks in the way. It was pointed out by the Secretary of the UGC that on 15th February 2005 a meeting had taken place. Parity was there earlier and that it should come now also. In fact, UGC had communicated this earlier to the Ministry. At the meeting of the small group on 15th February it was decided to find out the duties and responsibilities of the Librarians and DPEs, and the UGC is now collecting the said data from some Central Universities and some Universities and that when the data comes, they will be passed on to the Ministry.

**3. Status of Implementation of 1996 Pay Scales to University and College teachers - Bihar, Jharkhand, Assam and Orissa:** AIFUCTO pointed out that these States have not implemented the Fifth Pay Commission recommendations though Orissa and Assam has actually taken the central assistance already. It was therefore necessary to obtain the Status Reports in respect of all the states more particularly in respect of the above States. It was pointed by the HRD Official that letters have been sent to the States. It was suggested by the AIFUCTO that letters should be sent to the Chief Secretaries of the States concerned immediately. This was agreed.

**4. Implementation of Rastogi Committee recommendations: (a) CAS to Professor in Colleges:** The UGC pointed out that they had stated that only autonomous colleges professors' posts should be created. The AIFUCTO pointed out that creation of posts of Professor in Autonomous colleges has nothing to do with the demand of the AIFUCTO for CAS in colleges. The qualifications will be the same and may be some percentage of the posts could be opened in the colleges as in the Universities and given to teachers whose services are meritorious. **On 27 th July 1998 the HRD Ministry had issued Notification for promotion up to Professor as an integral part of the entire scheme.** Thereafter the UGC had also given guidelines as to how to promote Readers to Professors in the colleges and universities. In fact on the question of promotion to posts of Professors in Autonomous colleges the UGC had a separate paragraph which has nothing to do with the demand of the AIFUCTO on CAS in colleges. However, the UGC later on withdrew the proposal. The AIFUCTO is not aware whether there was any discussion between the Ministry and the UGC on this. On enquiry by the HRD Secretary, the UGC Secretary admitted that the decision was taken by the UGC without any discussion with the HRD Ministry. The HRD Secretary stated that the question was whether the facility should be extended to colleges or not? On this the UGC should give a brief (even sketchy) note of 3-4 pages to the HRD Ministry immediately.

**(b) NET/SLET exemption for PH.Ds:** On this issue. the AIFUCTO pointed out that the Rastogi Committee had recommended exemption of all Ph. D holders from NET/SLET. This was originally accepted by the UGC and later on the decision was changed. The AIFUCTO demanded that the UGC should honour its earlier decision based on the Rastogi Committee recommendations by reopening the issue all over

---

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**

Bahadur Shah Zafar Marg

New Delhi-110 002

No.F.1-11/97 (PS) : 23 March,2005

Prof. C.R. Sadasivan,
General Secretary, Gokuldham, Bldg-1
S.V.Road, Borivli (West), Mumbai - 400 092

**Subject :-** Regarding the appointment of Teachers in the Universities and Colleges in Maharashtra and the NET/ SET qualification condition.

Sir,

With reference to your letter dated 24.12.04 received in this office in Feb. 2005 on the above subject, I am directed to request you to send all the enclosures/ references quoted in the letter/Memorandum at an early date, to enable the Commission to consider the matter.

Yours faithfully,
**(K.C.Mathur)**
Section Officer

again. The HRD Secretary stated that the UGC should look into the matter.

**(c) Problems of Women teachers:** It was pointed out by the UGC that earlier Dr. Ms. Armaity Desai Committee had examined the issue and suggested laying down some norms. The said norms had been sent to the Govenment including on flexi time.

**(d) Pension to University and College teachers not covered by any pension scheme:** AIFUCTO reiterated that there were a small number of teachers who were not covered by any pension scheme and who were past 80 years. They had retired many years ago taking just Rs. 20,000/- or so. The Government had considered such cases and they were given minimum pension. However, Rajasthan Government has not done in this matter. This was also contained in the Rastogi Committee recommendations. HRD Ministry should write letters to the States in this respect particularly to Rajasthan and if AIFUCTO is given copy of the same, we will also take up with the govenment to resolve the issue.

**5. Private Universities:** HRD Secretary pointed out that most State Governments want legislation by the centre. They want the centre to make legislation permitting the State Governments to create Private Universities. The centre has told the States that they should take their own decisions and that the centre does not want to enter into this. The Government does not want to rush into any legislation as far as Private Universities are concerned.

**6. Foreign Universities:** The HRD Secretary stated that if Universities from foreign countries without proper accreditation come into the country and offer courses, it would be dangerous. There could be fly-by-night-operators which cannot be allowed. The Government could only give caveat emptor (Buyer Beware) and warn the public that these and these Universities are sub-standard and they should not go for them. But in spite of this, if students take to those Universities, we cannot help. The HRD Ministry is proposing to call Ambassadors of the different countries from where Universities are coming into India and asking them to give a status report about the credibility of the Universities in their respective countries.

**7. Service Conditions and appointment of teachers:** It was pointed out that the detailed note already submitted by AIFUCTO was placed before the HRD Minister. It was demanded by AIFUCTO that the central government should ask the State Governments to fill up all the posts of teachers in the Universities and colleges. The HRD stated that no CM or Education Minister was ready to take on the salary of the teachers in view of their own difficult financial situations.

At this stage, for want of time, the discussion was ended. The HRD Secretary summed up and stated that on three main points viz. (i) DPE and Librarians; (ii) Third Promotion; and (iii) CAS time limit has been fixed for action and stick to the time limit laid down by the HRD Minister. By 2nd March 2005 all reports will be submitted to the HRD Ministry by the concerned persons and by 9th March, 2005, it would be placed before the Minister for final decision.

The AIFUCTO expressed the hope that the issues will be seriously and urgently attended to resolve the issues pending for a long time.

*****

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION**

**( M F U C T O )**

*(Registered under the Trade Union Act 1926, Reg. No. By - II-8162 of 1985)*

Affiliated to the All Indian Federation of University and College Teachers' Organizations (AIFUCTO)

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.**

**President**
Prof. C.R. Sadasivan
R.K. Gokuldham, A/205
S.V.Road, Borivli (W)
Mumbai - 400 092
Tel : 022-28063667, 56938030
Mob: 9820781441

**General Secretary**
Prof. E.H. Kathale
N/162, Reshimbagh,
Nagpur - 440 009
Tel.-0712-2741098

MUMBAI : 29TH MARCH 2005

To,
Shri. K.C.Mathur,
Section Officer, University Grants Commission,
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110 002

Dear Sir,

This has reference to your letter No. F1-11/97(PS), dated 23 rd March 2005 in connection with MFUCTO's letter dated 24 th December 2004. You have asked me to send to you the enclosures/references quoted in the letter/memorandum.

In this connection, I wish to state that the MFUCTO had sent all the necessary accompaniments to the Memorandum dated 30 th March 2003. In fact, there has been a few more letters written from time to time as reminders to the UGC Chairman. I had also met the UGC Chairman, Dr. Arun Nigvekar impromptu sometime in January along with the AIFUCTO delegation and discussed this matter.

However, since you are in need of the said documents, I am sending the same to you with this letter.

The MFUCTO had submitted to the UGC by registered post A.D. a detailed Memorandum dated 30 th March 2003. The appointment for a delegation of the MFUCTO to wait on the Chairman was sought for in order to present the said Memorandum and to present other important documents. It is also to explain to the UGC the important parts of the Hon'ble Supreme Court decisions which will have a bearing in determining the fate of over 6000 University and college teachers in the State of Maharashtra.

The MFUCTO feels that the meeting is necessary.

In the light of these facts, it is once again requested that the Chairman may be moved so that the delegation of the MFUCTO could meet him. The date of the meeting may be intimated well in advance of at least 10-12 days so that the members of the deputation from the different parts of Maharashtra would be in a position to reach New Delhi in time by prearrangement.

Thanking you in anticipation,

Yours faithfully
(C.R.Sadasivan)
President, MFUCTO

# विनाअनुदानित समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान तत्वावर आणणे

*पहिले अधिवेशन २००५ : गुरुवार, दिनांक ७ एप्रिल, २००५ : महाराष्ट्र विधानपरिषद*

**सर्वश्री बी.टी.देशमुख,व्ही.यू.डायगव्हाणे,वसंतराव खोटरे,नानासाहेब बोरस्ते,जी.एल.अैनापुरे,वि.प.स.**
यांनी नियम ९३ अन्वये दिलेली सूचना

**श्री.धर्मरावबाबा आत्राम ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री )** : अध्यक्ष महोदय, सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे,वसंतराव खोटरे,नानासाहेब बोरस्ते,जी.एल.अैनापुरे,वि.प.स. यांनी "विनाअनुदानित समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान तत्वावर आणणे" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो. **उपसभापती** :निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

### नियम ९३ ची सूचना

"ज्याअर्थी, यवतमाळ येथे विनाअनुदानित समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी गेले ३३ दिवस साखळी उपोषण करीत आहेत व आता त्यांनी २८ मार्च २००५ च्या पत्रान्वये मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग यांना जिल्हा समाजकल्याण अधिकारी यवतमाळ यांच्यामार्फत आमरण उपोषणाची नोटीस दिलेली आहे. आणि;

ज्याअर्थी, कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय विभाग मंत्रालय मुंबई, यांनी संचालक, समाजकल्याण यांना दिनांक ३० मार्च २००५ रोजी पत्र लिहून आमरण उपोषणापासून या सेवकांना परावृत्त करण्याच्या सूचना दिल्या व त्यानुसार १ एप्रिल २००५ रोजी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी प्राचार्य, सावित्री ज्योतीराव फुले महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पत्र लिहून तसा प्रयत्न केला. 'अ' श्रेणीमधील महाराष्ट्रातील हे एकमेव महाविद्यालय असल्याने खुद्द या प्राचार्यांच्या महाविद्यालयाला "अनुदान देण्याच्या वेळी प्रथम या महाविद्यालयाला अनुदान दिले जाईल" असे स्पष्टपणे विधानपरिषद सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेवरील अनुपुरक चर्चेत सोमवार, दिनांक ७ एप्रिल २००३ रोजी (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, खंड १३१, क्रमांक १७, पृष्ठ ८७) सांगून सुद्धा त्याबाबत कोणतीही कारवाई झाली नाही. आणि;

ज्याअर्थी, २९ विनाअनुदानित समाजकार्य महाविद्यालयांना अनुदानावर आणण्याचा १६ जूलै २००४ रोजीच्या बैठकीत मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतरसुद्धा याबाबत कोणतीही कारवाई झाली नाही. "सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेली विनाअनुदानित समाजकार्य महाविद्यालये अनुदान तत्त्वावर आणण्याबाबत" या मथळ्याचा २४ ऑगस्ट २००४ रोजी एक शासननिर्णय निर्गमित करण्यात आला पण त्याप्रमाणे अनुदान वितरणाची प्रत्यक्षात कोणतीही कृति न झाल्याने या शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये अविश्वासाची भावना निर्माण झाली असून आमरण उपोषणाच्या निर्णयामुळे एकूण शिक्षण क्षेत्रातच तिव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्याअर्थी, हे सभागृह तिव्र चिंता व्यक्त करीत आहे."

### मा. मंत्रिमहोदयांचे निवेदन

सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या विनाअनुदानीत समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान तत्वावर आणण्यासंदर्भात दि. १९.११.२००३ च्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार अनुदानीत व विनाअनुदानीत समाजकार्य महाविद्यालयांची तपासणी संचालक/ अतिरिक्त संचालक, समाजकल्याण, पुणे व आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या पथकामार्फत करण्यात आली. सदर तपासणी पथकांने अनुदानीत व विनाअनुदानीत समाजकार्य महाविद्यालयांची तपासणी करुन तपासणी अहवाल शासनास सादर केला. सदर तपासणीमध्ये समाजकार्य महाविद्यालयांचे मुल्यांकन करुन गुणवत्तेच्या आधारे 'अ' 'ब + ब', 'क' व 'ड' अशी वर्गवारी करण्यात आली. सदर तपासणी अहवालाच्या अनुपंगाने विनाअनुदानीत समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान देण्यासंदर्भात प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर दि. १६.७.२००४ रोजी सादर करण्यात आला. त्यामध्ये २८ विनाअनुदानित समाजकार्य महाविद्यालयांपैकी २२ महाविद्यालयांना त्यांच्या वर्गवारीप्रमाणे अनुदान देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला. त्याप्रमाणे 'ड' वर्गवारीतील समाजकार्य महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यासंदर्भात दि. २४.८.२००४ आदेश निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये विनाअनुदानित तत्वावर समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत, असे नमुद केले आहे. त्यानुसार समाजकार्य महाविद्यालयांना देय अनुदानासाठी सन २००४-०५ मध्ये तरतुद उपलब्ध होवू शकली नाही. आता सदरची तरतुद उपलब्ध करुन घेण्यासाठी नवीन बाब भाग-१ च्या प्रस्तावाद्वारे रु. ५५९.१२ लक्ष एवढी तरतूद सन २००५-०६ मधील संकल्पात प्रस्तावित करण्यात आली आहे. तरतूद उपलब्ध झाल्यानंतर नियमानुसार आदेश निर्गमित करण्यात येतील. ज्या महाविद्यालयांना अनुदान तत्त्वावर मान्यता मिळालेली आहे त्या सर्व महाविद्यालयांना अनुदान देण्याचे आदेश निर्गमित होताच एकाच वेळी अनुदान देण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, यासाठी ५५९.१२ लक्ष रुपयांची तरतूद अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेली आहे परंतु या बाबतीतील अनुदान वितरणाचा शासन निर्णय निर्गमित करण्यास नंतर फार विलंब होतो. मुळात २४ ऑगस्ट २००४ रोजी मंत्रिमडळाने निर्णय घेतलेला आहे .याबाबतीत माझा लहानसा प्रश्न आहे. अधिवेशन संपल्यानंतर किती दिवसात अनुदान वितरणासंबंधीचा शासन निर्णय निर्गमित केला जाईल?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम** : अध्यक्ष महाराज, हा निधी आपण उपलब्ध करून दिलेला आहे, तेव्हा हे अधिवेशन संपल्यानंतर कमीत कमी दोन महिने तरी यासाठी लागतील.

**श्री. बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, दोन महिन्यामध्ये अनुदान वितरणाचा शासन निर्णय निर्गमित होईल काय ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम** : होय.

**श्री. बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, मी मुद्दाम येथे सांगू इच्छितो की, यामध्ये भ्रष्टाचार होऊ नये, भ्रष्टाचारास वाव राहू नये म्हणून मला एक दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. आता दोन महिन्यामध्ये अनुदान वितरणाचा शासन निर्णय निर्गमित होईल म्हणून माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितलेच आहे. तेव्हा आता मला असे विचारावयाचे आहे की, या सुचनेमध्ये आम्ही म्हटलेले आहे की, सावित्री जोतिराव फुले महाविद्यालय हे 'अ' श्रेणीतील महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय असल्याने खुद्द या प्राचार्यांच्या महाविद्यालयाला 'अनुदान देण्याच्या वेळी प्रथम या महाविद्यालयाला अनुदान दिले जाईल' असे स्पष्टपणे विधान परिषद सभागृहामध्ये लक्षवेधी सुचनेवरील अनुपूरक चर्चेच्या वेळी सोमवार, दिनांक ७ एप्रिल २००३ रोजी (महाराष्ट्र विधान परिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, खंड १३१, क्रमांक १७, पृष्ठ ८७) सांगूनसुद्धा याबाबत कोणतीही कारवाई झाली नाही. तेव्हा हे महाविद्यालय त्या आपल्या यादीमध्ये आहे की नाही ? आणि या २२ महाविद्यालयांची यादी आपण पटलावर ठेवणार का ? कारण मधल्या दलालांना यामध्ये भ्रष्टाचारास वाव मिळता कामा नये. म्हणून ही यादी पटलावर ठेवणे गरजेचे आहे.

**श्री. धर्मरावबाबा आत्राम** : अध्यक्ष महाराज, हे महाविद्यालय या यादीमध्ये समाविष्ट केलेले आहे आणि त्या २२ महाविद्यालयांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

### विनाअनुदानित समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान तत्वावर आणणे

*पहिले अधिवेशन २००५ : : महाराष्ट्र विधानपरिषद*

*शुक्रवार, दिनांक १५ एप्रिल, २००५*

**श्री. चंद्रकांत हांडोरे (सामाजिक न्याय मंत्री)** : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विना अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत" या विषयावरील सर्वश्री. बी.टी.देशमुख व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम ९३ अन्वयेच्या सूचनेबाबत दिनांक ७ एप्रिल २००५ रोजी केलेल्या निवेदनावरील अनुपूरक प्रश्नोत्तरांचे वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

**सभागृहाच्या पटलावर ठेवावयाची माहिती**

२९ विनाअनुदानित समाजकार्य महाविद्यालयांपैकी २२ विनाअनुदानित समाजकार्य महाविद्यालयांना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

(अ.क्र.) संस्था व महाविद्यालयाचे नाव (मान्य अभ्यासक्रम) मान्यता वर्ष

(१) नाशिक जिल्हा मराठा प्रसारक संचालित व्यवस्थापन संशोधन व तंत्रविभाग संस्था, समाजकार्य महाविद्यालय, नाशिक (एम.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(२) समता शिक्षण संस्था, पुणे संचालित डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क मोराणी, जि. धुळे (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९४-९५, १९९८-९९

(३) भगिनी मंडळ, चोपडा जि. जळगांव संचालित समाजकार्य महाविद्यालय, जळगांव (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९४-९५

(४) धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी जळगांव संचालित समाजकार्य महाविद्यालय, जळगांव (एम.एस.डब्ल्यु) १९९४-९५

(५) भाई छनूसिंग चंदेल स्मृति केंद्र, संचालित समाजकार्य महाविद्यालय, सोलापूर (एम.एस.डब्ल्यु) १९९४-९५

(६) श्री. शिवाजी शिक्षण संस्था वाशी संचालित रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, अकोला. (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(७) लोक सेवा मंडळ नरवेल, संचलित सावित्री ज्योतीराव फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ (बी.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(८) श्री. समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर संचलित स्वामी विवेकानंद समाजकार्य महाविद्यालय, नागपूर (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(९) गणपतराव थोटे सेवा संस्था, संचलित पुरुषोत्तम समाजकार्य महाविद्यालय, नागपूर (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(१०) डॉ. पंजाबराव देशमुख मेमोरिअल एज्युकेशन सोसायटी संचलित मातोश्री अंजनाबाई समाजकार्य महाविद्यालय, नरखेड, जि. नागपूर (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९४-९५

(११) बाळ गंगाधर टिळक बहुउद्देशिय शिक्षण संस्था संचलित ज्येतिराव समाजकार्य महाविद्यालय, उमरेड नागपूर (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९४-९५

(१२) साईबाबा ग्रामीण विकास संस्था, संचलित फुले आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, गडचिरोली (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(१३) नवचैतन्य शिक्षण संस्था, वडझरी, ता. पाटोदा जि. बिड संचलित समाजकार्य महाविद्यालय रामनगर, जालना (बी.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(१४) मानव लोक अंबेजोगाई जि. बीड संचलित समाजकार्य महाविद्यालय, अंबेजोगाई (एम.एस.डब्ल्यु) १९९८-९९

(१५) ग्रामिण विकास शिक्षण आणि क्रिडा प्रसारक मंडळ संचलित श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी बु. ता.जि.अकोला (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(१६) श्री. श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी अमळनेर जि. जळगांव संचलित पंडित जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय, चोपडा रोड. देवळी, ता. अमळनेर जि. जळगांव (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९६-९७

(१७) लोकसेवा मंडळ नरवेल, मलकापूर, बुलढाणा संचलित दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय, मलकापूर जि. बुलढाणा (सी.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु)

(१८) स्वामी विवेकानंद प्रसारक मंडळ, देऊळगांव राजा, संचलित महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, बुलढाणा (एम.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(१९) सुभेदार रामजी आंबेडकर एज्युकेशन संचलित महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्क, प्लॉट नं. २० गोदानी रोड, जि. यवतमाळ. (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(२०) महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालय जालना, डबल जिन जिजामाता नगर जूना जालना (परिवर्तन एज्युकेशन संचलित महात्मा फुले स.का.म.) (एम.एस.डब्ल्यु) १९९३-९४

(२१) इंडियन युथ ॲण्ड वुमेन डेव्हलपमेंट सोसायटी संचलित मदरटेरेसा समाजकार्य महाविद्यालय, काटोल जि. नागपूर (एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९४-९५

(२२) लॉर्ड बुद्धाज सारी पुत्र ज्ञानप्रसारक शिक्षण संस्था नागपूर संचलित समाजकार्य महाविद्यालय, कामठी नागपूर इस्माईलपूरा, येरखेडा रोड, कामठी, जि. नागपूर(एम.एस.डब्ल्यु, बी.एस.डब्ल्यु) १९९४-९५

**"निवृत्तिवेतनधारकांना महागाई वाढ देणे"**

उपरोक्त विषयावरील पूर्वीचे शासन निर्णय

(1) No. DRP-1099/130/SER-4, dated 29th July 1999. : P. 126 of 1999 NUTA Bulletin

(2) No. DRP-1099/305/SER-4 dated 15th November, 1999. : P. 161 of 1999 NUTA Bulletin

(3) No. PEN-1099/307/SER-4, dated 16th November, 1999 : P. 166 of 1999 NUTA Bulletin .

(४) क्रमांक निमवा १००२/२६१/सेवा-४, दिनांक २३ ऑगस्ट २००० : P. 39 of 2002 NUTA Bulletin

(५) क्रमांक निमवा १००२/२८१/सेवा-४, दिनांक : १३ ऑक्टोबर २००१ : P. 40 of 2002 NUTA Bulletin

(६) क्रमांक : सेनिवे-१००२/१/सेवा-४, दिनांक : १३ जानेवारी २००२ : P. 39 of 2002 NUTA Bulletin

(७) क्रमांक निमवा १००२/१३६/सेवा-४ दिनांक : १८ मे, २००२ : P. 41 of 2002 NUTA Bulletin

(8) No. DRP-1003/126/SER-4, dated 14th August 2003 : P. 80 of 2003 NUTA Bulletin

(9) No. DRP-1004/136/SER-4 dated 15th June, 2004. : P.77 of 2004 NUTA Bulletin

(10) क्रमांक : सेनिवे-१००४/१८५/सेवा-४, दिनांक : २० जुलै २००४ : P. 102 of 2004 NUTA Bulletin

(11) No. DRP-1005/246/SER-4 dated 28th March, 2005. : P.43 of 2005 NUTA Bulletin

**राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता वाढ देणेबाबत**

उपरोक्त विषयावरील पूर्वीचे शासन निर्णय

(१) क्रमांक मभवा ११८८/२१/सेवा-१०. दिनांक ३ मार्च १९८८. : P. 57 of 1988 NUTA Bulletin

(२) क्रमांक मभवा-११९८/प्र. क्र. १४/९८ सेवा-१०, दिनांक १४ डिसेंबर, १९९८ : P. 131 of 1999 NUTA Bulletin

(३) क्रमांक मभवा११९९/१६/सेवा-१०, दिनांक : ७ सप्टेंबर, १९९९ : P. 151 of 1999 NUTA Bulletin

(४) क्रमांक : मभवा ११९९/२३/सेवा-१०, दिनांक : ५ नोव्हेंबर १९९९ : P. 154 of 1999 NUTA Bulletin

(५) क्रमांक मभवा ११००/१५/२०००/सेवा-१०, दिनांक २२ ऑगस्ट, २००० : P. 36 of 2002 NUTA Bulletin

(६) क्रमांक मभवा ११००/प्र.क्र.३३/सेवा-९, दिनांक : १२ ऑक्टोबर २००१ : P. 37 of 2002 NUTA Bulletin

(७) क्रमांक मभवा ११०२/प्र.क्र.६/सेवा-९, दिनांक : १५ मे, २००२ : P. 37 of 2002 NUTA Bulletin

(८) क्रमांक मभवा ११००/प्र.क्र.३३/सेवा-९, दिनांक : ११ जानेवारी, २००२ : P. 38 of 2002 NUTA Bulletin

(९) क्रमांक मभवा ११०२/प्र.क्र.२२/सेवा-९, दिनांक : १४ ऑगस्ट, २००३ : P. 78 of 2003 NUTA Bulletin

(१०) क्रमांक मभवा ११०३/प्र.क्र.१४/सेवा-९, दिनांक : १० जून, २००४ : P.77 of 2004 NUTA Bulletin

(११) क्रमांक मभवा ११०४/प्र.क्र.५/सेवा-९, दिनांक : १९ जुलै, २००४ : P.101 of 2004 NUTA Bulletin

(१२) क्रमांक मभवा ११०४/प्र.क्र.१२/सेवा-९, दिनांक : २४ मार्च, २००५ : P.44 of 2005 NUTA Bulletin

# वरिष्ठ श्रेणीसाठी अर्हताकारी सेवा मोजतांना व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक.

*पहिले अधिवेशन २००५ : गुरुवार, दिनांक २४ मार्च, २००५ : महाराष्ट्र विधानपरिषद*

(१) * २५४० **श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे , प्रा. शरद पाटील** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २५ मार्च,१९९४ च्या पूर्ण वेळ शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या शासननिर्णयातील "**वरिष्ठ श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षांची अर्हताकारी सेवा**" ही अट शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २२ जानेवारी १९९३ च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे तंत्रशिक्षण विभागाने दिनांक १२ डिसेंबर,१९९४ रोजी शुध्दीपत्रक काढून वगळण्यात आली परंतु दिनांक १ जानेवारी २००० च्या शासननिर्णयात मात्र ती अट न वगळण्याचा हा दोष राहून गेल्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक दिली जात आहे अशी तक्रार करणारे एक निवेदन महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने मा.उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांना दिनांक १६ डिसेंबर,२००४ रोजी किंवा त्या दरम्यान सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १३ मे,१९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे शालेय शिक्षण विभागातील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीसाठी "नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाची सेवा" व त्याच स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षकांना दिनांक १ जानेवारी २००० च्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासननिर्णयाने "प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची सेवा" अशी भेदभावपूर्ण वागणूक देणारी व्यवस्था आज कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केलेली नसल्यास याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ? .

**श्री.सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिताः** (१) होय.

(२) नाही. अशासकीय अनुदानीत संस्थेतील अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणा-या शिक्षकांना दिनांक २५ मार्च,१९९४ च्या शासन निर्णयान्वये द्विस्तरीय वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे. तसेच या शासन निर्णयास अनुसरुन निर्गमित केलेल्या दिनांक १२ डिसेंबर,१९९४ च्या शुद्धिपत्रकान्वये वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह बारा वर्षाची अर्हताकारी सेवा (उच्च माध्यमिक स्तरावर ) या अटी ऐवजी उच्च माध्यमिक स्तरावर नेमणूकीच्या दिनांकापासून पूर्ण १२ वर्षे झालेली सेवा विचारात घ्यावी असे आदेशीत करण्यात आले आहे.

(३) व (४) दिनांक १ जानेवारी,२००० च्या शासन निर्णयामध्ये वरील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**श्री.वसंतराव खोटरे** : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, दिनांक २५ मार्च, १९९४ च्या पूर्ण वेळ शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या शासन निर्णयातील "वरिष्ठ श्रेणीसाठी प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षांची अर्हताकारी सेवा" ही अट शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २२ जानेवारी, १९९३ च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे तंत्रशिक्षण विभागाने दिनांक १२ डिसेंबर, १९९४ रोजी शुध्दीपत्रक काढून वगळण्यात आली. माझा प्रश्न असा आहे की, कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकाप्रमाणे या शिक्षकांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून १२ वर्षानंतर देण्यात आली. त्याप्रमाणे व्यावसायिक

*Dearness Relief on pension/family pension*

***GOVERNMENT OF MAHARASHTRA : FINANCE DEPARTMENT***

**Government Resolution : No. DRP-1005/246/SER-4 Mantralaya, Mumbai 400 032, dated 28th March 2005**

**Read :-** (1) Government Resolution, Finance Department, No. DRP 1004/136/SER-4 Dated 15th June 2004
(2) Government Resolution, Finance Department, No. PEN 1004/185/SER-4 Dated 20th July 2004

## RESOLUTION

Government is pleased to decide that dearness relief shall be paid to the State Government Pensioners/Family Pensioners on their basic Pension/Family Pension and Dearness pension/Dearness family pension **at the rate of 14%** with effect from 1st April 2005.

2. Payment of dearness relief involving a fraction of a rupee shall be rounded off to the next higher rupee.

3. It will be the responsibility of the Pension Disbursing Authority, i.e.Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be, to calculate the quantum of dearness relief payable in each individual case.

4. Government is also pleased to direct that above decision should, **mutatis mutandis,** apply to those employees including family pensioners of Recognised and Aided Educational Institutions, Non -Agricultural universities and Affiliated Non Government Colleges and Agricultural Universities to whom the pension scheme is made applicable.

5. In exercise of the powers conferred by the proviso to section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decision shall apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

6. State Government Employees who had drawn lumpsum payment on absorption in a PSU/Autonomous body./Local Bodies and have become entitled to restoration of 1/3rd commuted portion of pension as well as revision of the restored amount in terms of Government Resolution, Finance Department, No. COP 1099/306/SER-4, dated 15th November 1999 will also be entitled to the payment of dearness relief on full pension as per the provisions of Government Resolution, Finance Department, No. COP-1001/50/SER-4, dated 9th April 2001, at the prescribed rate and from the date, prescribed in paragraph 1 above.

7. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

8. All orders in force in regard to the payment of relief on pension sanctioned by Government from time to time will, **Mutatis Mutandis,** apply to the dearness relief now sanctioned.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**Jayant Y. Gaikwad**
Deputy Secretary to Government

अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना १२ डिसेंबर, १९९४ च्या शुध्दीपत्रकानुसार देण्यात येईल काय, यामध्ये शासनाने उत्तर दिले आहे परंतु ते ठोस उत्तर नाही. त्यासंबंधीचे आदेश केव्हा काढणार आहात ?

**श्री.सुरेश शेट्टी :** या विषयासंबंधी दोन दिवसापूर्वीच या सदनामध्ये चर्चा झाली होती त्यावेळी मी आश्वासन दिले होते की, हे अधिवेशन संपल्यानंतर इमिजिएट याच्यावर निर्णय करु. हे आश्वासन रेकॉर्डवर आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** अधिवेशन संपल्यानंतर कार्यवाही करु असे म्हणण्याची आवश्यकता नाही. आज हा पहिला प्रश्न आहे. यामध्ये धडधडीत असत्य उत्तर देण्यात आलेले आहे. आम्ही प्रश्न क्र.२ मध्ये असे विचारले होते की, दिनांक १३ मे, १९९९ च्या शासन निर्णयाप्रमाणे शालेय शिक्षण विभागातील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीसाठी "**नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाची सेवा**" व त्याच स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षकांना दिनांक १ जानेवारी, २००० च्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णयाने "**प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची सेवा**" अशी भेदभावपूर्ण वागणूक देणारी व्यवस्था आज कार्यरत आहे, ही गोष्ट खरी आहे काय, याला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा हे उत्तर दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे असे आपल्याला वाटत नाही का ?

**श्री.सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, जे लेखी उत्तर दिले आहे ते ठीक आहे. मा.सदस्यांनी जी मागणी केलेली आहे त्याबाबत मी आश्वासन देऊ इच्छितो की, यासंबंधी आम्ही पॉझिटिव्ह निर्णय घेणार आहोत.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदय दिलेले उत्तर ठीक आहे असे म्हणत आहेत. वास्तविक मी त्यांना उत्तर दुरुस्त करण्याची संधी देऊनही ते त्याच उत्तरावर ठाम आहेत म्हणून मी आता पुढील प्रश्न विचारतो. दिनांक १२ डिसेंबर, १९९४ च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे जी दुरुस्ती केली ती दिनांक १.१.२००० मध्ये केली नाही हे खरे आहे काय ?

**श्री.सुरेश शेट्टी : हे खरे आहे. या जी.आर.मध्ये थोडीशी दुरुस्ती करण्याचे राहिले आहे.** त्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे यावर आणखी चर्चा कशासाठी करावयाची ? यासंबंधी आम्ही पॉझिटिव्ह निर्णय घेणार आहोत हे मी मघाशीच सांगितले आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** चर्चा करण्याची आवश्यकता आहे. येत्या ८ दिवसामध्ये, १०-१५ दिवसामध्ये यासंबंधीचा आदेश निघणार आहे काय ?

**श्री.सुरेश शेट्टी :** अधिवेशन संपल्यानंतर इमिजिएट हे आम्ही करु.

**प्रा.बी.टी.देशमुख :** अधिवेशन संपल्यानंतर ८ दिवसात १०, १५ दिवसामध्ये दुरुस्ती करणारा शासन निर्णय निघेल काय ?

**श्री.सुरेश शेट्टी :** ठीक आहे, ७ दिवसामध्ये आम्ही करु.

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे :** या शिक्षकांच्या संदर्भात अधिवेशन संपल्यानंतर ७ दिवसात शासननिर्णय निर्गमित होईल असे मा.राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. माझा पूरक प्रश्न असा आहे की, याच विभागामध्ये ह्या शिक्षकांच्या बरोबरीने काम करणारे निदेशक आहेत. शिक्षक आणि निदेशक हे एका विभागामध्ये आणि एका युनिटमध्ये काम करतात. त्यांना मात्र ही वेतनश्रेणी दिली गेली नाही. प्रत्येक प्रश्नासाठी सातत्याने याठिकाणी येता येत नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या शिक्षकांच्या निर्णयासोबतच निदेशकांच्या बाबतीतही १२ वर्षाच्या संदर्भातील निर्णय घेतला जाईल काय ?

**श्री. सुरेश शेट्टी :** होय.

*****

## केंद्र शासनाची मदत घेतांना मान्य केलेल्या अटींचे पालन न केल्याबाबत

*पहिले अधिवेशन २००५ : : महाराष्ट्र विधानपरिषद*

*गुरुवार, दिनांक १७ मार्च, २००५*

**(१३) * १७९९ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. बसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने मान्य केलेल्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रात कृषी विद्यापीठातून लागू करताना ८०% रकमेची थकबाकी केंद्र शासनाकडून घेताना मान्य केलेल्या अटीचे राज्यशासनाने पालन केले नाही अशी तक्रार करणारे एक निवेदन ११ जानेवारी २००५ रोजी किंवा त्या दरम्यान ॲकेडेमिक स्टाफ असोसिएशन या प्राध्यापक संघटनेने कुलसचिव डॉ.पंजाबराव कृषि विद्यापीठ यांचे मार्फत मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांना सादर केले हे खरे आहे काय,

(२) खरे असल्यास केंद्रीय कृषी मंत्र्यांनी राज्याच्या कृषिमंत्र्यांना दिनांक १३ जुलै,२००४ रोजी किंवा त्या दरम्यान एक पत्र पाठवून केंद्राच्या अटींची बंधनकारकता लक्षात आणून दिलेली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) निर्णय झालेला नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) होय. हे खरे आहे.

(२) मा. कृषि मंत्री, भारत सरकार यांनी १३ जुलै, २००४ च्या अर्धशासकीय पत्रान्वये कृषि विद्यापीठांअंतर्गत शिक्षक वर्गिय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयाबाबत राज्य शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा अशी विनंती मा. कृषि मंत्री महाराष्ट्र शासन यांना केलेली आहे.

(३) व (४) या संबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

*****

## राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ एप्रिल २००५ पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करण्याबाबत

***महाराष्ट्र शासन : वित्त विभाग : शासन निर्णय, क्रमांक मभवा ११०४/प्र.क्र. १२/सेवा-९***

***मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ : दिनांक २४ मार्च २००५***

(पहा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा ११०४/प्र.क्र.५/सेवा-९. दिनांक १९ जुलै २००४

### शासन निर्णय

राज्य शासकीय कर्मचारी व महागाई भत्ता अनुज्ञेय असणाऱ्या इतर सर्व पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक **१ एप्रिल २००५** पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक महागाई वेतनाच्या ११ टक्के ऐवजी १४ टक्के दराने महागाई भत्ता वाढ **मंजूर करण्यात यावी.**

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भात विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

४. शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्यामुळे येणारा खर्च, हा त्यांचे वेतन व भत्ते यासंबंधीचा खर्च ज्या लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्याच लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था, नगरपरिषदा व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शीर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची घालण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची घालण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(मीना जोशी)**
शासनाच्या उपसचिव

# संपाबाबत शासननिर्णयाच्या विरोधात तंत्र शिक्षण संचालकांनी काढलेले परिपत्रक

*पहिले अधिवेशन २००५ : गुरुवार, दिनांक १७ मार्च, २००५ : महाराष्ट्र विधानपरिषद*

(३) * १६८३ **श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , प्रा. शरद पाटील , श्री. रमेश निकोसे** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १७ जानेवारी, २००४ च्या शासननिर्णयान्वये द्विलक्षी व एम.सी.व्ही.सी. चा अभ्यासक्रम शिकविणा-या शिक्षक/निदेशकांचा ४२ दिवसांचा संप कालावधी देय व अनुज्ञेय रजा म्हणून नियमित करण्याचा आदेश शासनाने दिलेला असताना शासनाच्या आदेशाशिवाय आपल्या दिनांक १९ ऑक्टोबर,२००४ च्या परिपत्रकान्वये नागपूर अधिवेशनावर मोर्चा (लाँग मार्च ) काढला म्हणून आय.टी.आय. निदेशकांचे २ ते ३ दिवसाचे वेतन कपात करण्याचे आदेश भेदभावपूर्ण वागणूक देणारे आहेत अशी तक्रार महाराष्ट्र राज्य आय.टी.आय.निदेशक संघटनेच्या कार्यवाहांनी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांच्याकडे ४ डिसेंबर, २००४ रोजी किंवा त्या दरम्यान केली हे खरे आहे काय,

(२) सदरहू तक्रारीत प्रथम दर्शनी तथ्य आढळून आल्याने मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी दिनांक १७ डिसेंबर, २००४ रोजी किंवा त्या दरम्यान उपरोक्त कारवाईस स्थगिती दिली हे खरे आहे काय,

(३) 'रजा घेणे हा संपाचा प्रकार' व मान्य रजा असली तरी 'सचोटी व कर्तव्य परायणतेच्या' ती गोष्ट विरुध्द आहे, यासारखी आक्षेपार्ह विधाने व आवश्यक सेवेचा चुकीचा अर्थ लावणे, इत्यादी दोष १९ ऑक्टोबर, २००४ च्या परिपत्रकात असल्याचे ४ डिसेंबर, २००४ च्या तक्रारीत नमुद आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) होय.

(२) होय. प्रत्यक्ष वस्तुस्थिती समजून घेवून त्यावर निर्णय होईपर्यन्त स्थगिती दिली आहे.

(३) अशा प्रकारचा उल्लेख दिनांक ४ डिसेंबर,२००४ च्या तक्रारीमध्ये आढळून येत नाही.

(४) शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचा मुलभूत नियम १७ (ए) व दिनांक १ मे,१९९१ च्या आदेशानुसार संप कालावधीतील अनुपस्थितीचे वेतन संप करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देय ठरत नाही. लाक्षणिक संपाबाबत केंद्रशासनाचे काम नाही वेतन नाही हे धोरण राज्य शासनाने अनुसरले आहे. **सामुहिक रजा घेणे हा एक प्रकारचा संप असल्याने वरील कालावधीतील सामुहिक रजेचा कालावधी विनावेतन म्हणून ग्राह्य धरण्यात यावा असा निर्णय शासनाने घेतला आहे.**

**श्री. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, एम,सी.व्ही.सी.च्या व्यावसायिक शिक्षकांना तसेच आय.टी.आय.च्या निदेशकांना माध्यमिक शिक्षकांची वेतनश्रेणी लागू केली जाते. परंतु गेल्या पाच ते सात वर्षे ही वेतनश्रेणी लागू केली नाही. याबाबत १७ जानेवारी २००४ ला शासनाने जी. आर. काढला. व्यावसायीक शिक्षकांचा ४२ दिवसांचा संपाचा कालावधी हा नियमित करण्यात आला. तसेच या दिवसांची वेतनाची रक्कम संबंधीत शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीत जमा केली आहे. आपण याप्रमाणे त्या शिक्षकांना न्याय दिला आहे. आता प्रश्न असा आहे की, या सर्व आय.टी.आय.च्या निदेशकांनी संप केला नव्हता. मोर्चा काढण्यासाठी दोनतीन दिवसांची त्यांची रजा मान्य करण्यात आली होती व त्यांना रजेचे वेतन देण्यात आले होते. आजच्या उत्तरामध्ये, ज्या उत्तरामध्ये पुष्कळ चुकीच्या गोष्टी आल्या आहेत त्याबाबत प्रश्न विचारुन मी सभागृहाचा वेळ घेत नाही. मी एकच प्रश्न विचारतो की त्यांची रजा मान्य करण्यात आली होती की नाही व त्यानंतर हा वेतन कपातीचा आदेश निघाला. असे जर होत असेल तर आपल्या वरिष्ठांवर कुणाचाही विश्वास रहाणार नाही. प्रश्न असा की, त्यांची रजा मंजूर झाली होती व त्यांचे वेतन झाले होते हे खरे आहे काय? असेल तर हे वेतन कपातीचे आदेश रद्द केले जातील काय?

**श्री. दिलीप वळसे पाटील** : शासकीय कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी वेळोवेळी अनेक आंदोलने केली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ४२ दिवसांचा संप करण्यात आला होता. वेतनश्रेणी आणि ४२ दिवसांच्या संपाचे वेतन या संदर्भात दिर्घ काळापासून शासन दरबारी त्यांची मागणी प्रलंबित होती. तिला वाचा फोडण्यासाठी त्यांनी पुन्हा तीन दिवसांचा लाँग मार्च काढला. आणि मग सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ४२ दिवसाच्या संपाच्या कालावधीबाबत त्यांना न्याय देण्याचा निर्णय घेतला व तसे सभागृहात सांगितले होते. परंतु प्रश्न असा निर्माण झाला की, ४२ दिवसांच्या संपाच्या रजेचा निर्णय राज्य सरकारने मंत्रिमंडळात घेतला, त्यामध्ये या तीन दिवसांच्या रजेचा समावेश करण्यात आला नव्हता.

**प्रा. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, ४२ दिवसांचा संप करणारी ही शिक्षक मंडळी पूर्णपणे वेगळी आहेत. त्यांनी मोर्चा काढला नव्हता तर या आय.टी.आयच्या निदेशकांनी मोर्चा काढला होता. हे जे एम.सी.व्ही.सीचे व्यावसायिक शिक्षक आहेत त्यांनी ४२ दिवसांचा संप केला होता. आणि हे दुसरे आय.टी.आय. निदेशक आहेत या लोकांनी संप केला नव्हता, त्यांची संघटना वेगळी आहे. या लोकांनी फक्त वर्ध्याहून नागपूर विधान भवनपर्यंत मोर्चा काढला. आपण याठिकाणी ४२ दिवसांच्या संपाच्या कालावधीचे वेतन अनुज्ञेय केले ते आपण योग्य केले. त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. परंतु आय.टी.आय.चे निदेशक रजा वरिष्ठांकडून मान्य करुन घेऊन मोर्चाला गेले त्यांची रजा मंजूर केली व त्यांना वेतनही दिले गेले. शासनाचा याबाबत निर्णय नसतांना या लोकांचे वेतन कापा असे पत्रक निघाले. माझे असे म्हणणे आहे की, न्याय्य मागण्यासाठी एका वर्गाने ४२ दिवसांचा संप केला आपण त्यांचे वेतन नियमित केले आणि आय.टी.आय. च्या दुसऱ्या वर्गाने तीन दिवसांची रजा घेऊन मोर्चा काढला म्हणून त्यांना दिलेले वेतन आपण कापून घेता हे परस्पर विसंगत आहे. आपल्या प्राचार्याकडून रजा मान्य करुन ते मोर्चाला गेले व त्यांना पगार दिला गेला आहे. तो पगार नंतर कापण्याचे आदेश काढण्यात आले आहे हे किती चुकीचे आहे? माझे असे म्हणणे आहे की, यामध्ये किती कारस्थान केले जात आहे? शासनाचा एक अधिकारी शासन निर्णय नसतांना, त्यांची रजा मंजूर असतांना दिलेले वेतन कापून घेतो आणि सांगतो की, ही अनिवार्य सेवा आहे. **त्यासंबंधीचा जी.आर. सुध्दा त्याने वाचलेला नाही. त्यामध्ये म्हटले आहे की, या शासन निर्णयाद्वारे व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशाचे काम, परीक्षेचे काम आणि निरीक्षणाचे काम यांचा अंतर्भाव अनिवार्य सेवेत केला आहे. या तीन गोष्टी त्यामध्ये बाधीत झालेल्या नाहीत.** त्यांनी रजा मान्य करुन घेतली. प्रश्न असा आहे की, आपण या दोन्ही वर्गाना मदत केली आहे. त्यांना ५-६ वर्षानंतर करेक्ट पे स्केल दिले आहे त्याबाबत सभागृहात मी आपल्याला धन्यवाद दिले. तेव्हा प्रश्न असा आहे की, रजा मान्य करुन मोर्चाला गेले व त्यांना त्या रजेचा पगार सुध्दा दिला गेला. तेव्हा ती कार्यवाही कायम केली जाईल व वेतन कापण्यासंबंधीचे आदेश रद्द केले जातील असे आपण सांगणार काय?

**श्री. दिलीप वळसे पाटील** : सभापती महोदय, एक विशेष बाब म्हणून हे आदेश रद्द केले जातील. आणि अशाप्रकारे भविष्य काळात कोणत्याही पध्दतीने सार्वजनिक स्वरुपामध्ये संप करण्यासाठी कर्मचारी बाहेर पडले तर ती बाब मान्य केली जाणार नाही. यावेळी ही विशेष बाब म्हणून मी मान्य करतो.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचा आभारी आहे की, त्यांनी या प्रकरणात स्वतः न्याय दिला. रजा मान्य करुन घेऊन आय.टी.आय.चे निदेशक मोर्चासाठी गेले, त्यांचे वेतन कापणे हे बरोबर नव्हते तरी त्यासंबंधात परिपत्रक काढण्यात आले. पण आता आपण विशेष बाब म्हणून याबाबतीत हे परिपत्रक मागे घेण्याचे ठरविलेले आहे. तर माझा आता प्रश्न एवढाच आहे की, याबाबतचे आदेश आठ दिवसात, पंधरा दिवसात किंवा महिन्याभरामध्ये, म्हणजे केव्हा निघणार आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : सभापती महोदय, याबाबतचे आदेश आज संध्याकाळपर्यंत काढले जातील.

*****

# STATUS AND SERVICE CONDITIONS OF TEACHERS IN AN AGE OF CAPITALISTIC GLOBALISATION

**PROF. MRINMOY BHATTACHARY**
*General Secretary, FISE*

Over the last two centuries, with the acceptance of the concept of welfare state, almost universal public education system covering the entire population gradually developed in Europe, America, Australia and Countries of Asia, Africa and Latin America, **which were under colonial occupation, were deprived of this development since the colonial rulers were afraid of the spread of education among the masses of these countries.** With the victory of the liberation struggle these countries started establishing their own countrywide education system. In many countries, teachers constituted the single largest community of white - collar employees. Since they were educated and directly or indirectly employed by the state, they were better organised and they effectively articulated their demands. **The demands were initially restricted to salaries and service conditions but soon extended to working conditions e.g. teacher-students ratio, educational facilities, structure of governance, preparation of syllabi and curriculum etc.**

अत्यंत महत्वाचे

**महाराष्ट्र शासन**

***क्रमांक एनजीसी : २०२/(१६६/०२)/विशि- उच्च व तंत्र शिक्षण विभाग,***

***मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२***

***दिनांक १३ जानेवारी, २००५***

प्रति,
(१) कुलसचिव, सर्व विद्यापीठे, (२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे, (३) सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण

**विषय :- नेट/सेट मधून सुट देण्याबाबतचे मानक**

महोदय,

उपरोक्त विषयावर विद्यापीठ अनुदान आयोगाने या विभागाच्या प्रधान सचिवांना लिहिलेल्या दिनांक ९ डिसेंबर, २००४ च्या पत्र क्रमांक एफ १-१/२००३/पीएस मिटींग, ची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदरहू पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने असे कळविले आहे की, अधिव्याख्याता या पदासाठी नेट/सेट मधून खालील बाबीव्यतिरिक्त सूट देता येणार नाही.

(१) संबंधित विषयात जर नेट/सेट परीक्षा घेतली जात नसेल आणि

(२) विधीवत जाहिरातीच्या माध्यमातून मुलाखतीसाठी बोलाविलेल्या उमेदवारांमध्ये नेट/सेट अर्हताधारक, उमेदवार उपलब्ध झाला नाही तर.

(३) विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १७ जुलै, २००३ च्या पत्रान्वये कळविले आहे की, आवश्यक शैक्षणिक अर्हता नसणाऱ्या उमेदवारांची विद्यापीठे व महाविद्यालयांनी अधिव्याख्याता या पदावर नियुक्ती करु नये. **परंतु ज्या प्रकरणी नेट/सेट मधून सूट मिळणे आवश्यक असेल अशा प्रकरणी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्याशिवाय नियुक्तीचे आदेश निर्गमित करु नयेत असेही आयोगाने कळविले आहे.** आयोगाच्या ह्या सूचना या विभागाच्या दिनांक २२ ऑगस्ट २००३ च्या समक्रमांकित पत्रान्वये आपल्या निदर्शनांस आणलेल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ९ डिसेंबर २००४ च्या पत्रात या सूचनांचा पुनरुच्चार करुन सर्व संबंधित महाविद्यालयांच्या विद्यापीठांच्या निदर्शनास ह्या सूचना आणून देण्याची विनंती आयोगाने केली आहे.

४. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना वेळोवेळी कळवून देखील काही महाविद्यालयांकडून त्यांचे पालन होत नाही असे दिसून येते. त्यामुळे पात्र उमेदवार उपलब्ध असतांनाही अपात्र उमेदवारांची नियुक्ती अधिव्याख्याता या पदावर केल्यास त्या महाविद्यालयांचे वेतनेत्तर अनुदान रोखून धरणे तसेच सदर अपात्र अधिव्याख्यात्यांची सेवा अनुदानास पात्र न धरणे अशा प्रकारची कठोर कारवाई संबंधित महाविद्यालयावर करण्यात येईल. तसेच कायम स्वरुपी विना अनुदान तत्त्वावर असलेल्या महाविद्यालयात अशा नेमणूका झाल्यास त्या महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यात येईल. अशा सूचना सर्व संबंधित महाविद्यालयांना द्याव्यात.

आपला विश्वासू,
**(अ.ना.भट्टलवार)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

Students, both youth and adolescents, have always played a radical and revolutionary role against social and economic injustices. A section of teachers have always been providers of such progressive ideas and inculcators of values of selflessness, social commitment and patriotism. Reactionary forces also every-where have opposed spread of such ideas and organisations and have taken steps, often draconian in nature, to suppress such progressive movements and organisations, e.g. banning organisations, deporting, arresting, imprisoning and even murdering teachers.

After the second World War, FISE was established in 1946 in Paris as the first international teachers' union on the basis of broad anti-fascist unity. One of the very first initiatives of FISE was to frame an international legal framework for the status and service conditions of teachers. Progressive teachers movements at the national level in different countries and the initiatives of FISE resulted in the adoption of Joint UNESCO-ILO Charter in 1966 on Status and Service conditions of Workers in Teaching Profession.

**This charter is rightly considered Magna Carta of Teachers Movement.** This charter covered school teachers and excluded teachers of higher education from its purview. **It took another 30 years for Teachers' Movement to secure a similar charter for teachers in higher educational. In 1996,** UNESCO general conference adopted the Charter on Services conditions of Teachers in Higher Education, Adoption of an international framework does not automatically lead to improvement of status and service conditions because many governments refuse to ratify them and some even after ratification refuse to implement them on one alibi or the other. Nevertheless, they are important since they mark international and inter-governmental recognition of the need to provide an open democratic set up for the teaching community to function in.

But we have so far described one side of the story, the one of progressive development. **In the last two decades of the 20th century and now in the twenty first century, there has been a continuous retrograde development in the field of educational management, and structure of governance of educational institutions.** While this development is different from country to country and not uniform in terms of speed and coverage, there is a lot of similarity.

Following are the common features

1) The state is expressing its inability to maintain the public education system not to speak of improving its quality and coverage.

2) The elite of the society is unhappy with the quality of public education and establishing private high-cost and high quality educational institutions many are interested in sending their children abroad to buy high quality education there.

3) Development of information and communication technology (ICT) makes it easier to export education fast and at low cost.

4) Fall in the quality of public education creates opportunity of mushroom growth of private education. Some institutions are actually providing high quality education. While for many the quality is low and questionable but they are perceived to be of high-quality because of their exterior show and high-cost sales promotions.

5) Structure of salaries in the private sector varies widely from very high to very low with the latter being predominant.

6) Union are either weak or nonexistent. In some, the farsighted managements created official unions.

7) Unqualified and under-qualified, untrained and under trained teachers are appointed.

8) Teachers are appointed on an ad-hoc basis, part time basis, contractual terms and / or paid at piecerate, hourly rate, period-rate etc.

9) No payment is made in many cases during vacation or for holidays and term-ending recess.

10) To deny benefit of continuing service the teachers suffer regularly break in-service at the end of an year or term and then reappointed.

11) Teachers are denied normal facility of leave. Even maternity leave is denied circumventing national, and International laws.

12) No superannuation benefit is given, since the service is not for full tenure. The employers thus save on pension, gratuity and provident fund contribution.

13)Courses and even institution can be and are actually closed down when they cannot be run profitably for falling enrolment.

14) To mark a distinction with the preexisting full tenure teaching personnel, various novel designations are created e.g. Teaching Assistants, Para-teachers, Friends of Education, Guest Lecturers/Teachers etc.

15) International capital has realized the potential of making good money from international trade in education sector which, by one estimate, can have a turnover exceeding $2 trillions. In several developing countries they are establishing virtual universities / university franchises in collaboration with one or more universities/education / research institutions. Many of these institutions suffering from financial difficulties are only too willing to cooperate.

What has been stated above relate to the attacks on the preexisting organised education system. In consequence, the structure of organised education is breaking down at different places. There is another area which unlike this had been informal all along but now is growing in Importance and spreading in all directions. This includes the following : Private tution and coaching classes were there all the time. However, fall in quality of education in public institutions and race for more and better-than-rest, have expanded their scope to a gigantic dimension.

In some states of India coaching institutions are run as parallel, colleges, residential colleges with proper routine, staff, accounting staff etc.

Many young people are reconciled to their position as lifelong private tutors. Thus tution becomes all-time profession.

Many Institutions running professional courses have also started new professional Information and communication technology, hospitality, media and entertainment etc. They were there all the time but in scope and coverage both have increased. Needless to say that the staff, teaching as well as administrative and auxiliary, have hardly any security and social benefits. **Thus the very nature of teaching profession or education sector as such is undergoing radical transformation. For the staff, these developments has all been negative in nature.**

**(Courtsey TM 0305 P27)**

*****

# अनुदान वितरणातील विलंबामुळे सहा महिने वेतन न होणे

*पहिले अधिवेशन २००५ : गुरुवार, दिनांक २४ मार्च, २००५ : महाराष्ट्र विधानपरिषद*

(५) * १७९६ **प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, प्रा. शरद पाटील :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ४ सप्टेबर १९९९ च्या शासननिर्णयातील परिच्छेद ४ नुसार अनुदान वितरणाची जबाबदारी तंत्रशिक्षण संचालनालयाने पार न पाडल्यामुळे, डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट, २००४ पासूनचे वेतन अजूनही अदा करण्यात आलेले नाही, अशी तक्रार करणारे एक निवेदन या तंत्रनिकेतन मधील शिक्षक संघटनेने दिनांक १५ जानेवारी २००५ रोजी किंवा त्या दरम्यान सहसंचालक, तंत्रशिक्षण अमरावती यांचेमार्फत मा.संचालक तंत्रशिक्षण यांना सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता :** (१) होय.

(२) डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती या संस्थेतील कर्मचाऱ्यांना माहे डिसेंबर,२००४ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आलेले आहे. संस्थेच्या पुढील तीन महिन्याच्या वेतन अनुदानाचे देयक फेब्रुवारी,२००५ मध्ये अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई यांना सादर करण्यात आले असून देयक पारित झाल्यावर सदर रक्कम कर्मचा-यांचे वेतन अदा करण्यासाठी संस्थेस वितरीत करण्यात येईल.

**प्रा. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये त्यांनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. त्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, “दि. २८.१०.२००४ म्हणजेच दिवाळीपूर्वी सुध्दा सर्व कर्मचाऱ्यांनी अत्यंत तातडीने आपणास पत्र पाठवून दिवाळीपूर्वी आमचे पगार करण्याची विनंती केली होती परंतु या पत्रव्यवहाराची आपणाकडून आतापर्यन्त कोणतीही दखल घेतली गेली नाही. त्यामुळे आजच्या घडीला आमचे ऑगस्ट, २००४ पासूनचे म्हणजेच पाच महिन्यांचे पगार थकीत आहेत”. हा जो विलंब झाला त्याचे कारण काय ? मी मुद्दाम यासाठी विचारतो की, येथे पुन्हा त्या श्री. तळेकर सारखा प्रकार आहे काय ? शासन निर्णयाच्या विरुध्द जाऊन ...

**उपसभापती** : आता श्री. तळेकर हे आयडॉलच्या भूमिकेत जाणार काय?

**प्रा. बी. टी. देशमुख :** ते जाऊ द्या. श्री. तळेकर यांचा उल्लेख बाजूला टाकू माझे असे म्हणणे आहे की, हा विलंब का झाला ? याचे कारण मला पाहिजे.

**श्री. सुरेश शेट्टी :** फेब्रुवारी पर्यन्तचे सर्व वेतन दिले गेले आहे. आता आम्ही एकूण ९९.६ लाख रुपये या संस्थेला रिलीज केले आहेत. फेब्रुवारी पर्यन्तचे पूर्ण वेतन दिले गेले आहे. फक्त पे अँड अकाऊंट्समध्ये आणि आमच्या खात्यामध्ये थोडे कोऑर्डीनेशन ठीक नाही म्हणून हे झाले होते. या अगोदर सुध्दा या बाबत आपण सदनात आश्वासन दिले होते की, याबाबतीत बसून आमच्या डिपार्टमेंटमध्ये ही प्रोसेस सिम्प्लीफाय करण्यासाठी आणि एफिशिएंट करण्यासाठी आम्ही..

**प्रा. बी. टी. देशमुख :** मी माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, प्रोसेस करेक्ट आहे. प्रोसेसमध्ये काहीही बदल करण्याची आवश्यकता नाही. दि. ४ सप्टेंबर, १९९९ चा शासन निर्णय आहे त्यातील परिच्छेद ४(२) मध्ये अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केलेली आहे. पण त्यांच्या टेबलावरचे कागद हलतच नाहीत, हा खरा त्रास आहे. म्हणून मी मुद्दाम विचारले होते की, शासन निर्णय असताना हे लोक सहा महिने विलंब करतात याची तुम्ही चौकशी केली आहे काय ? त्याचे उत्तर दिले नाही. आता मी ते विचारत नाही. दि. ४ सप्टेंबर, १९९९ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे आणि त्या त्या तिमाहीचे आगाऊ अनुदान दिले पाहिजे, १ तारखेला ते झाले पाहिजे अशी तरतूद आहे. त्याप्रमाणे सक्त कार्यवाही करण्याचे आदेश आपण आपल्या अधिकाऱ्यांना द्याल काय ? नाही तर त्यांना त्याबाबतीत जबाबदार धरणार काय ?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, आदेश देऊ.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** यामध्ये सॅलरी आणि नॉन सॅलरी हे अनुदान एकत्र दिले जाते. अनेक मॅनेजमेंट नॉन सॅलरीसाठी हे अनुदान वापरतात. वर्धा येथील कॉलेजमध्ये जवळजवळ २५ लाख रुपये त्यांनी इमारत बांधण्यासाठी पगारातून वापरले. सॅलरी अनुदान आणि नॉन सॅलरी अनुदान वेगवेगळे करुन सॅलरी अनुदानातून कोणताही पैसा इकडे वापरता येणार नाही अशा सक्त सूचना दिल्या जातील काय ?

**श्री. सुरेश शेट्टी :** नियम असा आहे की, सॅलरी अनुदान हे सॅलरीसाठीच वापरले पाहिजे. परंतु असे होत नाही हे खरे आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक संस्था अशा आहेत की ते सॅलरीचे अनुदान घेऊन दुसरीकडे वापरतात. अशा बाबी पुढे आल्या तर त्यांच्यावर ॲक्शन घेऊ.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

*****

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATIONS**
**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, "B" Road, Churchgate, Mumbai - 400 020**

# MOVEMENT RESOLUTION

**(adopted by the MFUCTO Executive Committee at its Meeting held on SUNDAY, 13th March 2005)**

THEREFORE this Meeting of the Executive Committee of the MFUCTO held today, Sunday, 13th March 2005 in Mumbai resolves

**A.** To call upon the Government of Maharashtra to remove forthwith Dr. S.N. Pathan from the post of Director of Higher Education, Maharashtra State,

**B.** To call upon the University and College teachers in the State to organize a STATE LEVEL MASSIVE DHARNA of the University and College Teachers at the Office of the Director of Higher Education, Pune, on Monday, 11th April 2005 between 12 noon and 5 p.m.;

**C.** To call upon the University and College teachers in the State to organize a MASSIVE MORCHA to the Office of the Director of Higher Education, Pune, on Monday, 25th July 2005 at 2 p.m.;

**D.** To call upon the University and College teachers in the State to organize DEMONSTRATIONS at the Offices of the Joint Directors of Higher Education in the different regions on the First Monday in each of the months of August, September, October and November 2005 at the time as may be convenient to the different regions; and

E. To call upon the University and College teachers in the State in the event of the Government of Maharashtra not resolving by then the pending issues, to organize an INDEFINITE STRIKE of teachers from the Non-Agricultural Universities in the State and the Colleges affiliated to them from Monday, 5th December 2005.

**(C.R. Sadasivan)** President **(E.H. Kathale)** General Secretary

**MUMBAI, 13TH MARCH 2005**

(Full text of the Resolution is printed on page 20 to 24 of 2005 NUTA Bulletin)

# MASSIVE MORCHA

of University and College teachers in the State

**TO THE OFFICE OF THE DIRECTOR OF HIGHER EDUCATION, PUNE,**

**on Monday, 25th July 2005 at 2 p.m.**

# DEMONSTRATIONS

By the University and College teachers

at the Offices of the

Joint Directors of Higher Education at Nagpur and at Amravati

on the

**FIRST MONDAY**

in each of the months of

**AUGUST, SEPTEMBER, OCTOBER AND NOVEMBER 2005**

from 3.00 P.M. to 5.00 P.M.

active participation in large number is requested

- Secretary, **NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION.**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/ 2001/4448 Licenced to post without prepayment **LICENCE NO.** NR/ATI/78/2002 Name of the Posting office : **R.M.S. Amravati.**
Date of Posting : **10.05.2005**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,......................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................

.........................................................................